१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• पुणे, गुरुवार २१ मे, २०२६ • वर्ष-५, अंक-२४१, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 241 Marathi - Daily - Pune, 21 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे

24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

आळशी आणि बेरोजगारांसाठी नवीन राजकीय पक्ष?

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

## थोडक्यात...

### नसरापूर अत्याचार प्रकरणाची आजपासून दररोज सुनावणी

**पुणे** - राज्याला हादरवून सोडणाऱ्या नसरापूर येथील अत्याचार आणि खून प्रकरणात आता जलदगतीने न्यायप्रक्रिया राबवली जाणार आहे. आरोपी भीमराव कांबळे याच्याविरुद्ध १४ दिवसांत आरोपपत्र दाखल करण्यात आल्यानंतर पुण्यातील विशेष न्यायालयात उद्यापासून दररोज सुनावणी घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यात घडलेल्या या संतापजनक घटनेने संपूर्ण राज्यात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. सुट्यांमुळे गावी आलेल्या चार वर्षीय चिमुकलीला घरासमोर खेळत असताना आरोपीने पळवून नेल्याचा आरोप आहे. त्यानंतर तिच्यावर अत्याचार करून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक बाब उघड झाली. घटनेनंतर पुरावे लपवण्याचाही प्रयत्न केल्याचा आरोप असून, यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड संताप आहे. या पार्श्वभूमीवर या प्रकरणाचा जलद निकाल व्हावा यासाठी न्यायालयाने दररोज सुनावणी घेण्याचे निश्चित केले आहे.

### तेलाच्या किमती वाढल्याने देशाचा विकास दर घसरणार

**नवी दिल्ली** - वाढत्या इंधनाचे दर, पश्चिम आशियातील संघर्ष आणि जागतिक मंदीचे सावट यामुळे चालू आर्थिक वर्षात भारताचा विकास दर ६.२ टक्क्यांपर्यंत घसरण्याचा अंदाज 'इक्रा' या पतमानांकन संस्थेने वर्तवला आहे. हा विकास दर पूर्वीच्या ६.५ टक्के या अंदाजापेक्षा कमीच आहे. 'इक्रा'च्या मुख्य अर्थतज्ज्ञ अदिती नायर यांनी सांगितले की, पश्चिम आशियातील तणावामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात खनिज तेलाचे भाव वधारले आहेत. अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया कमकुवत झाल्यामुळे आयात महागली असून महागाईवर दबाव वाढला आहे. जागतिक पुरवठा साखळीतील अडथळे आणि शहरी मागणी मंदावल्यामुळे औद्योगिक व निर्यात क्षेत्रावर परिणाम झाला आहे.

# मोदी-शहा गद्दार! राहुल गांधींची जहरी टीका

# भाजपाचा जोरदार पलटवार! राहुल राजकारणातील 'राहू'



**काँग्रेसचे खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी आज पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर कडाडून टीका केली. मध्य पूर्वेतील युद्धामुळे देशवासीय संकटाचा सामना करत आहेत आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी इटलीमध्ये चॉकलेट वाटत फिरत आहेत, सेल्फी काढत आहेत, व्हिडिओ रिल बनवत आहेत, असे राहुल गांधी म्हणाले. पुढे जाऊन राहुल गांधी यांनी मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांना थेट गद्दार म्हटले. राहुल गांधींच्या या वक्तव्यावर भाजपाने पलटवार केला. राहुल गांधी हे देशाच्या राजकारणातील राहू आहेत, असे भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन म्हणाले.**



■ अमेठी

**राहुल** गांधी आज उत्तर प्रदेशच्या रायबरेली आणि अमेठी मतदारसंघांच्या दौऱ्यावर आले होते. रायबरेलीच्या धुलवारी गावात वीरा पासी यांच्या मूर्तीचे अनावरण राहुल गांधी यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी काँग्रेस कार्यकर्ते आणि समर्थकांसमोर त्यांनी त्वेषाने भाषण केले. राहुल गांधी म्हणाले की, जेव्हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते तुमच्याकडे येतील तेव्हा ते तुमच्यासमोर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्याबद्दल बढाया मारतील. तेव्हा त्यांच्या तोंडावर सांगा की तुमचे पंतप्रधान मोदी गद्दार आहेत, तुमचे गृहमंत्री अमित शहा गद्दार आहेत, तुमची संघटना गद्दार आहे, तुम्ही देश विकण्याचे पाप केले आहे. तुम्ही देशाच्या राज्य घटनेवर हल्ला केला आहे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर हल्ला केला आहे. तुम्ही गांधीजींवर हल्ला केला आहे.

मोदी तुम्हाला सांगतात पेट्रोल-डिझेलचा कमीत कमी वापर करा, एक वर्षभर सोने खरेदी करू नका, परदेश प्रवास करू नका आणि दुसऱ्याच दिवशी स्वतः महागड्या परदेश दौऱ्यावर हजारो कोटी रुपयांच्या विमानात बसून निघून जातात. मी पुन्हा सांगतो, मोदींनी देशाची अर्थव्यवस्थाच विकली आहे. अदानी, अंबानी आणि अमेरिकेच्या हाती भारताची अर्थव्यवस्था मोदींनी सोपवली आहे. येत्या दोन-तीन महिन्यांत महागाईचा असा झंझावात सुरू होईल की तुम्हा सर्वांना त्याचा जबरदस्त फटका बसेल. तेव्हा मोदी तुम्हाला सांगतील की यात माझी काही चूक नाही. कोविड काळात मोदींनी असेच तुमच्यासमोर नाटक केले होते. पण मी तुम्हाला सांगतो की, दोष पूर्णपणे नरेंद्र मोदी, अमित शहा आणि आरएसएसचा आहे. कारण त्यांनी संविधान नष्ट करण्याचे पाप केले आहे.

राहुल गांधी यांच्या या भाषणाचा व्हिडिओ काही क्षणातच सोशल मीडियावर व्हायरल झाला. त्यावर प्रतिक्रिया देताना भाजपा अध्यक्ष नितीन नबीन म्हणाले की, राहुल गांधींचे हे वक्तव्य भारतीय राजकारणातील शुचिता आणि एकमेकांचा आदर राखण्याच्या परंपरेला छेद देणारे आहे. निवडणुकांमध्ये सातत्याने होत असलेल्या पराभवामुळे आलेले नैराश्य राहुल गांधींच्या बोलण्या-वागण्यातून स्पष्ट दिसते. राहुल गांधी हे देशाच्या राजकारणातील राहू आहेत.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील राहुल गांधी यांच्या विधानावर आक्षेप घेतला. राहुल गांधी यांच्याबद्दल मी याआधी बोललो होतो. पण त्यावेळी शरद पवारांना माझे बोलणे आवडले नव्हते. मुख्यमंत्र्यांच्या तोंडी अशी भाषा योग्य नाही, असे पवार म्हणाले होते. पण मी आज पुन्हा एकदा सांगतो, राहुल गांधी हा देशाच्या राजकारणातला रिजेक्टेड माल आहे, असे फडणवीस म्हणाले.

## देशव्यापी केमिस्ट बंद दुकानदारांचा पूर्ण प्रतिसाद




**ऑनलाईन औषधविक्री, भरमसाठ डिस्काऊंट, डॉक्टरांच्या चिठ्ठीकडे दुर्लक्ष करणे याविरुद्ध आज केमिस्ट व ड्रगिस्ट संघटनांनी एक दिवसीय देशव्यापी संप पुकारला होता. या संपाला दुकानदारांनी पूर्ण प्रतिसाद दिला. सरकारने आमच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले तर बेमुदत संप करण्याचा इशारा आज देण्यात आला.**

■ मुंबई

**कर्नाटक,** उत्तरप्रदेश, तेलंगणात संपाला प्रतिसाद मिळाला तर केरळ, गुजरात, सिक्कीम व इतर काही राज्यातील दुकानदारांनी विक्री सुरू ठेवण्याची लेखी हमी केंद्रीय औषध मानक नियंत्रण संघटनेला दिली होती. महाराष्ट्रात मात्र बंदला जोरदार प्रतिसाद मिळाला.

मुंबई, रत्नागिरी, रायगड, सोलापूर, कोल्हापूर, चंद्रपूर, वर्धा, अहिल्यानगर, नागपूर अशा सर्वच जिल्ह्यात आज केमिस्ट दुकाने बंद होती. सकाळी १० ते सायंकाळी ५ पर्यंत कडकडीत बंद पाळण्यात आला. नागपूरच्या हुतात्मा संविधान चौकातून दुकानदारांनी मोर्चा काढत शहरातील सात हजार दुकाने बंद ठेवली. सोलापूर शहर व जिल्हा भागातील ४ हजार दुकाने आज बंद होती. केमिस्ट दुकानदारांनी सकाळीच सोलापूरच्या हुतात्मा चौकातून मोठा मोर्चा काढला. सांगलीतही ४२०० दुकाने बंद होती. आजच्या बंदमुळे सरकारी रुग्णालयातील रुग्णांना फटका बसला. सरकारी रुग्णालयात औषधे उपलब्ध नसल्याने ते केमिस्टकडून औषधे आणायला सांगतात, मात्र आज केमिस्ट बंद असल्याने अडचण झाली.

केमिस्ट दुकानदारांचे म्हणणे आहे की, २०१८ साली

» पान ७ वर

## कृष्णा-गोदावरी गॅस प्रकरणात सुप्रीम कोर्टात रिलायन्सकडून केंद्राकडे मध्यस्थीची मागणी

■ नवी दिल्ली

**भारताच्या** सर्वात मोठ्या कॉर्पोरेट कायदेशीर वादांपैकी एक असलेल्या कृष्णा-गोदावरी बेसिन गॅस स्थलांतर प्रकरणात आज सुप्रीम कोर्टात महत्त्वाची सुनावणी झाली. रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि तिच्या परदेशी भागीदार कंपन्यांनी केंद्र सरकारसोबत वाद मिटवण्यासाठी मध्यस्थीचा मार्ग स्वीकारण्याची इच्छा व्यक्त केली.

या प्रकरणाची सुनावणी मुख्य न्यायमूर्ती सूर्य कांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठ करत होते. त्यात न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम. पंचोली यांचाही समावेश होता.



सुनावणीदरम्यान रिलायन्स आणि तिच्या भागीदार कंपन्यांच्या वतीने उपस्थित वकिलांनी न्यायालयाला सांगितले की, सर्व याचिकाकर्ते आज भारत सरकारला पत्र लिहून मध्यस्थी प्रक्रिया सुरू करण्याची विनंती करतील. कंपन्यांनी न्यायालयाला विनंती केली की, मध्यस्थीचा निकाल येईपर्यंत प्रकरणाची सुनावणी थांबवावी. मात्र, केंद्र सरकारच्या

» पान ७ वर

## देशातील १० राज्यांना उष्णतेच्या लाटेचा इशारा

■ नवी दिल्ली

**देशभरात** भीषण उष्णता जाणवू लागली आहे. सोमवारी तर महाराष्ट्रासह उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेश, पंजाब, हरियाणात तापमानाचा पारा ४६ च्या पुढे गेला होता. आजपासून येत्या २४ मेपर्यंत देशातील १० राज्यांना उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला असून याकाळात अर्धा देश उष्णतेने होरपळणार असल्याची शक्यता 'स्कायमेट'ने वर्तविली आहे.

देशात सर्वात जास्त तापमान उत्तर प्रदेशातील बांदा येथे होते. येथे पारा ४७.६ सेल्सिअस नोंदवला गेला. त्याचबरोबर प्रयागराज-४६.८, पंजाबमधील भटिंडा-४७, महाराष्ट्रातील वर्धा-४६.५, अमरावती येथे ४६.४, अकोला येथे

**२४ मेपर्यंत अर्धा देश उष्णतेने होरपळणार**

४६.३, हरियाणातील सिरसा येथे ४६.२, राजस्थानमधील चित्तोडगड आणि पिलानी-४६.२, श्रीगंगानगर- ४६.१ आणि बिकानेर येथे ४६ पारा होता. खाजगी हवामान संस्था स्कायमेटनुसार, कालपासून २४ मेपर्यंत

» पान ७ वर


## अमेरिकन संसदेत इराणविरुद्धचे युद्ध थांबवण्याचा प्रस्ताव मंजूर

**राष्ट्राध्यक्षांकडे अजून व्हेटोचा अधिकार**

■ वॉशिंग्टन

**अमेरिकन** संसदेत राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या लष्करी अधिकारांवर मर्यादा आणणारा प्रस्ताव मंजूर झाला आहे. मतदानात ४ रिपब्लिकन खासदारांनीही विरोधी डेमोक्रॅट पक्षाला साथ दिली. तर ३ रिपब्लिकन खासदार मतदानात सहभागी झाले नाहीत. हा प्रस्ताव ५०-४७ मतांनी मंजूर झाला असला तरी कायदा बनण्यासाठी अजून काही टप्पे बाकी आहेत. जर हा प्रस्ताव कायदा बनला, तर ट्रम्प सरकारला इराणविरुद्ध युद्ध सुरू ठेवण्यासाठी काँग्रेसची मंजुरी घ्यावी लागेल.

सध्या सिनेटमध्ये यावर अंतिम मतदान बाकी आहे.



त्यानंतर रिपब्लिकन बहुमत असलेल्या हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हजकडून मंजुरी घ्यावी लागेल. मात्र त्यानंतरही ट्रम्प यांना यावर व्हेटो करण्याचा अधिकार आहे आणि तो व्हेटो रद्द करण्यासाठी सिनेट व हाऊस या दोन्ही ठिकाणी दोन-तृतीयांश बहुमत आवश्यक असेल, जे सध्या कठीण मानले जात आहे.

विरोधकांचे म्हणणे आहे की, युद्ध सुरू करण्याचा किंवा सैन्य पाठवण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षांकडे नसून संसदेकडे असावा. अमेरिकन संविधानातही अशीच तरतूद आहे. हा प्रस्ताव व्हर्जिनियाचे डेमोक्रॅट सिनेटर टिम केन यांनी मांडला आहे.

» पान ७ वर

## मनोज जरांगे यांचे प्रसाद लाड यांना चर्चेसाठी जाहीर निमंत्रण

■ जालना

**मराठा** आरक्षणासाठी पुन्हा एकदा आंदोलनाचे शस्त्र उपसणारे मनोज जरांगे-पाटील यांनी आज जरा नरमाईची भूमिका घेतली. सरकार मराठा समाजाच्या मागण्यांबाबत सकारात्मक असून चर्चेतून मार्ग काढू, असे प्रसाद लाड यांनी म्हटले होते. त्या विधानाचा संदर्भ देत जरांगेंनी लाड यांना अंतरवाली सराटी येथे चर्चेसाठी येण्याचे जाहीर निमंत्रण दिले आहे. जरांगे म्हणाले की, आम्ही सरकारच्या विरोधात नाही. जर सरकार आमच्या सर्व मागण्या मान्य करणार असेल तर आम्हालाही आंदोलन करण्याची हौस नाही. प्रसाद लाड यांनी २३ मेपर्यंत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मराठा समाजाच्या सर्व मागण्या मंजूर करून घ्याव्यात व मंजुरीचे पत्र घेऊन अंतरवाली सराटी यावे. सरकारशी चर्चा करून मागण्या मान्य करून घेण्याची भूमिका घेतल्यानंतर जरांगे यांनी आंदोलनाची पुढील रणनीती ठरवण्यासाठी गावागावांमध्ये सुरू असलेल्या मराठा समाजाच्या बैठका २३ मेपर्यंत स्थगित करण्याचे निर्देश दिले. मात्र ३० पासून आमरण उपोषणाच्या भूमिकेवर जरांगे ठाम आहेत.

## शरद पवारांकडून पंतप्रधान मोदींची स्तुती मविआत खळबळ! रोहित पवारही नाराज

■ मुंबई

**ज्येष्ठ** नेते शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत केलेल्या वक्तव्यामुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. मुंबईत झालेल्या एका कार्यक्रमात बोलताना पवार यांनी 'पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जगभरात भारताची प्रतिष्ठा जपण्याचे काम करत आहेत,' असे म्हणत मोदींचे कौतुक केले. त्यांच्या या वक्तव्यामुळे महाविकास आघाडीत नाराजीचे सूर उमटले आहेत. याच कार्यक्रमात पवार यांनी अजित पवार गटाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचेही कौतुक केले. त्यामुळे शरद पवार गटाचे आमदार



रोहित पवार नाराज झाल्याचा दावा केला जात आहे.

विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वीच शरद पवार यांनी पत्रकार परिषदेत मोदी सरकारवर टीका करत अर्थव्यवस्थेची खरी स्थिती जनतेसमोर मांडण्याची गरज असल्याचे म्हटले होते. त्यामुळे अल्पावधीतच त्यांच्या भूमिकेत झालेला बदल चर्चेचा विषय ठरला आहे. यावर उबाठाचे खासदार संजय राऊत म्हणाले की, आम्ही शरद पवारांच्या विधानाशी सहमत नाही. इंदिरा गांधी, राजीव गांधी, मनमोहन सिंग हे परदेशवारीला गेल्यानंतर पत्रकारांशी बोलत होते. त्यांनी कधीही मीडियापासून पळ काढला नाही. १२ वर्षे मोदी मीडियापासून का पळ काढत आहेत? याचा अर्थ हाच आहे की त्यांना सत्य लपवायचे आहे.

» पान ७ वर

## वाल्मीक कराडची प्रकृती खालावली मागील ३ दिवसांपासून सलाईनवर

■ बीड

**मस्साजोगचे** सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी गजाआड असलेल्या वाल्मीक कराडची

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा



तुरुंगात प्रकृती पुन्हा ढासळली आहे. वाल्मीक कराड कारागृहात मागील ३ दिवसांपासून सलाईनवर आहे. त्याला वेळीच योग्य उपचार मिळाले नाही तर त्याचे यकृत निकामी होण्याची शक्यता असल्याचे बोलले जात असून त्याला अंबाजोगाई स्थित स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात हलवण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत.

काही दिवसांपूर्वी वाल्मीक कराड आजारी होता. त्याला युरोसिस्टायसिसचा संसर्ग झाल्याचा अंदाज आहे. युरोसिस्टायसिस हा मूत्राशयाशी संबंधित आजार आहे. त्यात मूत्रमार्गात संसर्ग होतो. बीड जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय पथकाने त्याची वैद्यकीय तपासणी केली. पण त्याची प्रकृती सातत्याने ढासळत आहे. वाल्मीक कराडवर १९९९ ते २०२४ या २५ वर्षांत परळी शहर पोलीस

» पान ७ वर

## मेटाची पुन्हा कामगार कपात सुरू पहाटे मेल! ८ हजार कर्मचारी काढले

**मेटाने आपल्या कर्मचाऱ्यांच्या कपातीच्या नव्या फेरीला सुरुवात केली असून जागतिक स्तरावर सुमारे १० टक्के कर्मचारी म्हणजेच जवळपास ८ हजार कर्मचाऱ्यांना नोकरीवरून काढले जाणार आहे. कंपनीने कर्मचाऱ्यांना याबाबत माहिती देण्यास सुरुवात केली असून सिंगापूरमधील टीमला सर्वप्रथम सूचना मिळाल्या आहेत.**

■ नवी दिल्ली

**सिंगापूरमधील** प्रभावित कर्मचाऱ्यांना पहाटे ४ वाजता ई-मेल पाठवण्यात आले. मार्क झुकरबर्ग




यांच्या नेतृत्वाखालील कंपनी यंदा एआय क्षेत्रात अब्जावधी डॉलरची गुंतवणूक करण्याच्या तयारीत असताना ही कपात करण्यात येत आहे. कपात आणि फेरबदलांपूर्वी मेटामध्ये जागतिक स्तरावर सुमारे ७८ हजार कर्मचारी कार्यरत होते. मेटा वेगवेगळ्या टाइम झोननुसार टप्प्याटप्प्याने प्रभावित कर्मचाऱ्यांना ई-मेल पाठवत आहे. कंपनीने अमेरिका, ब्रिटन आणि इतर भागांतील कर्मचाऱ्यांना आज घरून काम करण्यास सांगितल्याचेही समजते. मेटाच्या चीफ पीपल ऑफिसर जनेल गेल यांनी अंतर्गत मेमोमध्ये सांगितले की, ८ हजार कर्मचाऱ्यांच्या कपातीबरोबरच सुमारे ७ हजार कर्मचाऱ्यांची नव्या एआय केंद्रित

» पान ७ वर

## कच्चे तेल ११० डॉलर पार नाटो होर्मुजमध्ये प्रवेश करणार

■ वॉशिंग्टन

**इराण-अमेरिका** युद्धामुळे जागतिक तेल पुरवठा बाधित झाला असून कच्च्या तेलाचे भाव प्रतिपिंप ११० डॉलरवर पोहोचले आहे. त्यामुळे संपूर्ण जगात घबराट माजली आहे. ही कोंडी फोडण्यासाठी नाटो संघटनेतली देश होर्मुजच्या सामुद्रधुनीत लष्करी कारवाई करण्याची शक्यता आहे.

एका अहवालानुसार इराणने जर होर्मुज जलमार्ग खुला केला नाही,तर नाटोच्या युद्धनौका होर्मुजमध्ये उतरून मोठी लष्करी कारवाई करण्याची शक्यता आहे.

इराणने होर्मुज जलमार्ग रोखल्याने आणि नंतर अमेरिकन नौदलाने होर्मुजची नाकेबंदी केल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे भाव युद्धपूर्व काळातील भावापेक्षा पन्नास टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. ही कोंडी लवकर फुटली नाही तर कच्च्या तेलाचे भाव आहेत त्याहून भयंकर वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

अमेरिकेने इराणशी युद्ध छेडल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी नाटो राष्ट्रांना, सोबत येण्याचे आवाहन केले होते. त्यांनी नाटो राष्ट्रांना आपली साथ देण्याचे आवाहन केले होते.पण एकाही देशाने ट्रम्प यांना साथ दिली नव्हती. मात्र आता वाढत्या आर्थिक नुकसानामुळे नाटोच्या भूमिकेत अचानक बदल झाला आहे.


# नेहरू यांच्या घराण्याची संपत्ती ...

**नेहरू खानदान अतिशय गर्भश्रीमंत खानदान होते. मोतीलाल त्यावेळी नामांकित वकील होते, त्यांनी १८८३ साली वकिलीस प्रारंभ केला. स्वतःच्या कर्तृत्वावर त्यांनी प्रचंड संपत्ती अर्जित केली. १४ नोव्हेंबर १९०० रोजी जवाहरलाल यांच्या वाढदिवसाचे निमित्त म्हणून अलाहाबादच्या चर्चरोडवरची सर सय्यद अहमद खान यांची जीर्ण हवेली आणि त्याच्याबरोबर असणारा मोठा परिसर त्यांनी इसवी सन १९०० साली तब्बल १९,००० रुपयांना विकत घेतला. याचे कारणदेखील असे सांगण्यात येते की, हे तेच स्थळ होते जिथे राम आणि भरत या बंधूंची भेट झाली होती आणि म्हणून ही जागा मोतीलाल नेहरुंनी प्रचंड किंमत देऊन खरेदी केली. यावर अमाप पैसा खर्च करून एक मोठी इमारत बांधली ज्यामध्ये एकावेळी १०० लोकांच्या राहण्याची सोय होती .**

युरोप आणि चीनमधील फर्निचर, झुंबर यांने सुशोभित या महालात विजेची देखील सोय व्हावी म्हणून विजेचे खांब बसविण्यात आले. आजपासून ११० ते ११५ वर्षापूर्वी घरात वीज, विजेचे बल्ब आणि विजेचे खांब ही बाब खूप आश्चर्यकारक होती. शिवाय या हवेलीच्या समोर बाग-बगीचा आणि पोहण्याचा तलावदेखील होता. या तलावात पोहण्यासाठी तेज बहादूर सप्रू देखील येत असत. आनंद भवन असे तिचे नाव सार्थ करणारी ही हवेली होती.

जवाहर १९१४ साली शिक्षण संपवून भारतात परतल्यावर आणि काँग्रेस च्या कार्यात स्वतःला वाहून घेतल्यावर १९१७ पासून ही हवेली स्वातंत्र्य आंदोलनाचे एक केंद्र बनली आणि गांधींच्या प्रेरणेने या हवेलीला स्वराज भवन असे नाव दिले गेले. रावी नदीच्या तीरावर जवाहरलाल नेहरूंनी २९ डिसेंबर १९२९ ला पूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मांडला आणि २६ जानेवारी १९३० ला तिरंगा ध्वज फडकावून पहिला स्वातंत्र्य दिन साजरा केला. त्यावेळी भाषण करताना नेहरू म्हणाले, देशासाठी आपण सर्वस्व अर्पण करण्याची तयारी ठेवली तरच स्वातंत्र्य मिळेल'! असे म्हणून नेहरूंनी त्याचवेळी स्वातंत्र्याच्या कार्यासाठी ही हवेली काँग्रेसला कायमस्वरूपी दानपत्र लिहून देऊन टाकली.

स्वकष्टाने कमवलेली प्रचंड संपत्ती दान करून सर्व सुख पायाशी लोळण घेत असताना, नेहरू यांच्या कुटुंबातील प्रत्येकाने स्वातंत्र्य लढ्यात भाग घेऊन तुरुंगवास भोगला. मोतीलाल नेहरू यांनी मिठाच्या सत्त्याग्रहात २ वर्ष तर जवाहरलाल नेहरू यांनी एकूण ९ वर्षाचा तुरुंगवास भोगला. एक वेळ तर मोतीलाल आणि जवाहर दोघेही बापलेक कारागृहात होते, त्यावेळी जवाहरलाल यांच्या मातोश्री स्वरूपराणी नेहरू यांनी काँग्रेसच्या कामाची धुरा सांभाळली. जवाहरलाल यांच्या पत्नी कमला नेहरूंनी प्रकृती साथ देत नसताना सुद्धा १ वर्ष कारावास भोगला आणि आजारपण वाढले म्हणूनच त्यांची सुटका झाली, जवाहर आणि कमला यांची मुलगी आणि जावई इंदिरा गांधी आणि फेरोज गांधी यांनी लग्नानंतर अवघ्या ६ महिन्यात भारत छोडो आंदोलनादरम्यान सहभाग



घेतल्यामुळे २ वर्षाची शिक्षा भोगली, जवाहरलाल यांची सर्वात धाकटी बहीण कृष्णा हाथीसिंग यांनी २ वर्षाचा तर तिच्यापेक्षा थोरली बहीण विजयालक्ष्मी पंडित यांनी ३ वर्षाचा कारावास भोगला. विजयालक्ष्मी यांचे पती रणजीत सीताराम पंडित हे तर १९४४ कारागृहात सजा भोगत असतानाच मरण पावले. मोतीलाल यांचा पुतण्या ब्रिजकुमार नेहरू आणि त्यांची पत्नी रामेश्वरी नेहरू यांनी ही 'भारत छोडो' आंदोलनात सहभाग घेतला.

नेहरूंना अनेक वेळा लाठी हल्ला सहन करावा लागला, कमला नेहरूंनी देखील एकवेळ लाठी झेलली. एक प्रसंग आवर्जून सांगायला हवा तो असा की, मोतीलाल नेहरूंचे निधन झाले होते ,मुलगा जवाहर आणि सून कमला दोघेही कारागृहात होते ,तेव्हा ८ एप्रिल १९३२ रोजी जालियानवाला बाग घटनेच्या स्मृतिदिनानिमित्त निघालेल्या मोर्चाचे नेहरूंच्या आई स्वरूपराणी यांनी नेतृत्व केले,त्यावेळी त्यांना पोलिसांनी काठीने गंभीर मारहाण केली. रक्तलांच्छित अवस्थेत त्या कित्येक वेळ बेशुद्ध अवस्थेत पडून होत्या. यावेळी त्या लाठी हल्ल्यात ठार झाल्या अशी अफवा उठली होती. नेहरूंना कारागृहात असताना ही बातमी समजली तेव्हा त्यांच्यावर दुखाचा डोंगर कोसळला होता. तीन दिवसांनी आई सुखरूप असल्याचे पत्र त्यांना मिळाले तेव्हा त्यांना समाधान वाटलं.

सेतू माधव पगडी यांच्या 'जीवन सेतू' या आत्मचरित्रात नेहरू कुटुंबाबद्दल एक शेर वाचायला मिळतो .

अपनी कुर्बनियोंसे मशहूर है नेहरू खानदान,

ये शमा देख, ये पूरा घर के घर परवाना है।

- राज कुलकर्णी

# निवृत्तीच्या अर्जावर दोन आठवड्यांत निर्णय घ्या! सिडकोला सक्त आदेश



■ मुंबई

**निवृत्ती** जवळ आली असतानाही अधिकाऱ्याच्या प्रलंबित अर्जावर निर्णय न देणाऱ्या सिडकोला उच्च न्यायालयाच्या सुट्टीकालीन खंडपीठाने झटका दिला. निवृत्ती जवळ आलेल्या अधिकाऱ्याच्या अर्जावर निर्णय घेण्याबाबत वेळकाढूपणा करू नका, पुढील दोन आठवड्यांच्या आत अर्जावर योग्य तो निर्णय द्या, असे सक्त आदेश न्या. अद्वैत सेठना आणि न्या. संदेश पाटील यांच्या खंडपीठाने दिले. त्यामुळे याचिकाकर्त्या महादेव देवकर यांना दिलासा मिळाला आहे.

याचिकाकर्ते महादेव देवकर हे लवकरच सेवेतून निवृत्त होणार आहेत. त्यांनी गेल्या महिन्यात २२ एप्रिल रोजी सिडको भवन येथील मुख्य प्रशासकीय अधिकारी (जलसंपदा) यांच्याकडे अर्ज केला होता. त्या अर्जावर सिडकोकडून कोणताही निर्णय घेतला गेलेला नाही. निवृत्ती जवळ आली असतानाही अर्ज प्रलंबित ठेवला जात असल्याच्या मुद्यावरुन देवकर यांनी उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती. त्यांच्या याचिकेवर न्या. अद्वैत सेठना आणि न्या. संदेश पाटील यांच्या सुट्टीकालीन खंडपीठाने सुनावणी घेतली.

देवकर यांनी ज्या प्राधिकरणाकडे अर्ज केला आहे, ते स्वतंत्र प्राधिकरण आहे. आपल्याला या विषयावर निर्णय घेण्याचे कायदेशीर अधिकार नाहीत, असा युक्तिवाद सिडकोच्या वकिलांनी केला. मात्र, याचिकाकर्त्यांचे वकील संजीव सावंत यांनी त्याच अधिकाऱ्यांकडून निर्णयाची मागणी लावून धरली. दोन्ही युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर खंडपीठाने याचिकाकर्त्या देवकर यांच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरला. त्याला अनुसरून महादेव देवकर यांच्या अर्जावर दोन आठवड्यांत योग्य तो निर्णय घ्यावा, असे निर्देश खंडपीठाने सिडकोच्या मुख्य प्रशासकीय अधिकाऱ्यांना (जलसंपदा) दिले. या प्रकरणात याचिकाकर्त्यांतर्फे ॲड. संजीव सावंत, ॲड. हेरंब कदम आणि ॲड. मल्हार बागेश्वर यांनी काम पाहिले, तर राज्य सरकारतर्फे एजीपी व्ही. जी. बाडगुजर आणि सिडकोतर्फे ॲड. प्रियांश जैन यांनी बाजू मांडली.

# सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या भ्रमण मार्गाचा विस्तार नाही

■ कराड

**प्रकल्प प्रशासनाने केले स्पष्टीकरण**

**सह्याद्री** व्याघ्र प्रकल्पाच्या कॉरिडॉरचा म्हणजेच भ्रमण मार्गाचा विस्तार सध्या होणार नाही. नव्याने तयार करण्यात आलेल्या आखाड्यात अशा कोणत्याही प्रस्तावाचा समावेश नसून यामध्ये सातारा आणि सांगली जिल्ह्यातील गावांना वगळले आहे, असे सह्याद्री व्याघ्र प्रकल्प विभागाने स्पष्ट केले आहे

जनसुनावणी व स्थानिक शेतकरी, लोकप्रतिनिधींच्या विरोधानंतर हा निर्णय घेण्यात आला असून यामुळे बाधितांना मोठा दिलासा मिळाला आहे. सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या नवा भ्रमण मार्ग म्हणजे कॉरिडोर आराखड्यात सातारा, सांगली जिल्ह्यांतील कोणत्याही गावांचा समावेश केला नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



पु.ल.देशपांडे कला दालनात काष्ठ शिल्प प्रदर्शन (छाया: दीपक साळवी )

# सीएसआरमधून राज्यात १५० कोटींचे करार! मुख्यमंत्र्यांची माहिती

■ मुंबई

**सीएसआर** परिषदेच्या माध्यमातून राज्यात एकूण १५० कोटी रुपयांचे करार करण्यात आले आहेत. या माध्यमातून कॉर्पोरेट कंपन्यांच्या सामाजिक दायित्व निधी तळागाळापर्यंत पोहोचवला जाईल. तसेच्या राज्यातील विविध विकासात्मक व सामाजिक कामांसाठी या निधीचा वापर केला जाईल. त्याचबरोबर या माध्यमातून सव्वा लाख नवे रोजगार उपलब्ध होतील, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

ग्रामीण विकास, शिक्षण, आरोग्य आणि अन्य सामाजिक उपक्रमांसाठी या १५० कोटींच्या निधीचा वापर केला जाईल.हा निधी याआधी मुंबई महानगर प्रदेश (एमएमआर) आणि पुणे महानगर प्रदेश (पीएमआर) क्षेत्रामध्येच प्रामुख्याने वापरला जात होता. आता मात्र गडचिरोली आणि नंदूरबारवर विशेष लक्ष दिले जाणार आहे. येथे शिक्षण आरोग्य कौशल्यविकास आदी उपक्रम मोठ्या प्रमाणावर राबवण्यासाठी सीएसआर निधीचा वापर केला जाणार आहे, असे फडणवीस म्हणाले.

सीएसआर करारांव्यतिरिक्त अमेरिकन वकिलातीच्या माध्यमातून अमेरिकेतील अणुऊर्जा क्षेत्रातील दीडशे मोठ्या कंपन्या महाराष्ट्रात येऊन गेल्या. या कंपन्यांसोबत २५ हजार मेगावॉट क्षमतेचे चार करार करण्यात आले आहेत. संपूर्ण जग सध्या स्वच्छ ऊर्जेसाठी अणुऊर्जेकडे पाहात आहे. अमेरिकेत निर्मिती होणाऱ्या एकूण विजेपैकी ४९ टक्के वीज अणुऊर्जेच्या माध्यमातून येते. केंद्र सरकारने अणुऊर्जेच्या सामाजिक वापरासाठी शांती नावाचा कायदा केला आहे. त्या कायद्याच्या अनुषंगाने राज्याने अणुऊर्जा निर्मितीच्या क्षेत्रात वाटचाल सुरू केली आहे, असे फडणवीस यांनी सांगितले.

# कल्याण-डोंबिवलीत शुक्रवारी बारा तास पाणीपुरवठा बंद

■ डोंबिवली

**संभाव्य** पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जलसंपदा विभागाकडून देण्यात आलेल्या निर्देशांनुसार कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने कार्यवाही करण्यास सुरुवात केली आहे. त्याचाच भाग म्हणून येत्या शुक्रवार २२ मे रोजी कल्याण- डोंबिवली शहराचा पाणीपुरवठा १२ तास बंद राहणार आहे. पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता महेश डावरे यांनी याबाबत प्रसिद्धी पत्रकाद्वारे माहिती दिली आहे. भारतीय हवामान खात्याने यावर्षी एल निनो आणि आयओडीच्या प्रभावामुळे पावसाळा लांबण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

याच पार्श्वभूमीवर जलसंपदा विभागासोबत १४ मे रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार, आगामी काळात पाणीटंचाई निर्माण होऊ नये यासाठी सर्व महापालिका, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि संबंधित प्राधिकरणांनी समन्वयाने पाणी कपात करण्याचे ठरविले आहे.

# खासगी ट्रॅव्हल्स गाड्यांना मुंबईच्या वेशीवरच रोखणार

**मुंबई पालिका आयुक्त अश्विनी भिडे यांची माहिती**

■ मुंबई

**राज्यासह** देशभरातून मुंबईत दररोज येणाऱ्या हजारो खासगी ट्रॅव्हल्स मुंबईच्या वेशीवर म्हणजे जकात नाक्यावर थांबवण्यात येणार आहेत. या बाहेरील गाड्यांमुळे मुंबईत होणारी प्रचंड वाहतूककोंडी फोडण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती पालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी दिली.

अश्विनी भिडे यांनी सांगितले की, या गाड्यांमधून येणाऱ्या प्रवाशांना मुंबईच्या विविध भागात जाण्यासाठी मेट्रो, बेस्ट आणि कॅबची सुविधा कनेक्ट करून दिली जाणार आहे. मुंबईच्या वेशीवर उतरणाऱ्या प्रवाशांच्या सोयीसाठी दहिसर नाक्यावर थ्री स्टार हॉटेल, पार्किंग हब, फूड प्लाझा उभारण्यात येणार आहे. यासाठी पालिका सुमारे १२३२ कोटींचा खर्च करणार आहे. पालिकेच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत असलेले जकात नाके २०१७ मध्ये बंद करण्यात आल्यामुळे दहिसर आणि मानखुर्द जकात नाके ओस पडले आहेत. त्यामुळे या दोन्ही जकात नाक्यांवर सोयीसुविधांसह थ्री स्टार, फाईव्ह स्टार हॉटेल, शॉपिंग सेंटर, पार्किंग हब अशा सुविधा उपलब्ध करण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे. दहिसर जकात नाक्यावर सध्या १८,८६९ चौरस मीटर जागा आहे, तर मानखुर्द जकात नाक्यावर २९,७७४ चौरस मीटर जागा रिकामी आहे.

# बदली धोरणामुळे परिचारिकांचे आझाद मैदानावर धरणे आंदोलन

■ मुंबई

**राज्यातील** परिचारिकांना प्रशासकीय बदली धोरणातून वगळण्याच्या मागणीसाठी मुंबईतील आझाद मैदान येथे तीन दिवस धरणे आंदोलन करण्यात आले. यामध्ये राज्यातील विविध संघटनांच्या परिचारिका सहभागी झाल्या होत्या.

परिचारिका संघटनांच्या मते, राज्यातील सुमारे ९० टक्के परिचारिका महिला आहेत. त्या सकाळ, दुपार आणि रात्र अशा तिन्ही पाळ्यांमध्ये रुग्णसेवा देतात. त्यामुळे त्यांचे कौटुंबिक जीवन आधीच ताणतणावाचे असते. अनेक परिचारिकांवर मुले, आई-वडील आणि कुटुंबातील ज्येष्ठांची जबाबदारीही असते. अशा परिस्थितीत प्रशासकीय बदल्यांमुळे त्यांचे कौटुंबिक आणि मानसिक संतुलन बिघडत आहे.परिचारिकांच्या दर तीन वर्षांनी अंतर्गत बदल्या होत असतात. त्यामुळे अतिरिक्त प्रशासकीय बदल्यांची गरज नाही. तसेच परिचारिकांकडे कोणताही आर्थिक किंवा प्रशासकीय कारभार नसल्याने त्यांना या धोरणातून कायमस्वरूपी वगळावे आणि केवळ विनंती व तक्रार आधारित बदल्या कराव्या.परिचारिकांच्या अनेक मागण्या आजही प्रलंबित आहेत.

# वाहनाची दुचाकीला मागून धडक दोन जिवलग मित्रांचा जागीच मृत्यू

■ शहापूर

**मुंबई-नाशिक** महामार्गावर आटगाव परिसरात झालेल्या भीषण अपघातात दोन जिवलग मित्रांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना आज सकाळी ९.३० च्या सुमारास घडली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, मृतांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दीप भेरे(१९) आणि हर्षल कांबळे (१८) असे मृत्यमुखी पडलेल्या दोघांची नावे आहेत. हे दोघे मित्र दुचाकीवरून मुंबई-नाशिक महामार्गाने नाशिकच्या दिशेने जात होते.

# महापारेषणकडून सार्वजनिक वाहतूक व ई-वाहन वापराला प्राधान्य

■ मुंबई

**पश्चिम** आशियामध्ये निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने सुचविलेल्या प्रतिबंधात्मक आणि आपत्कालीन उपाययोजना महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने (महापारेषण) तातडीने लागू करण्यास सुरुवात केली आहे. यासंदर्भात अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) सुचिता भिकाने यांच्या मार्गदर्शनाखाली महापारेषणने परिपत्रक जारी करून सर्व परिमंडळ, मंडळ, विभाग आणि उपविभाग कार्यालयांना आवश्यक निर्देश दिले आहेत. ऊर्जाबचतीसाठी दैनंदिन वापराकरिता इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# वसईतील निर्मळच्या सुळेश्वर तलावाची गाळामुळे दुरवस्था

**भाविकांची मोठी गैरसोय**

■ वसई

**संपूर्ण** वसई तालुक्यातील अनेक कुटुंबांसाठी सुळेश्वर हे अंतिम धार्मिक विधींसाठीचे पारंपरिक आणि श्रद्धेचे ठिकाण आहे. आपल्या प्रिय व्यक्तींच्या अस्थी विसर्जनासाठी येथे येणाऱ्या भाविकांची वर्षभर वर्दळ असते. मात्र तलावातील वाढलेला गाळ, कमी झालेली पाण्याची पातळी आणि अस्वच्छ परिसर यामुळे या पवित्र स्थळाचे सौंदर्य आणि महत्त्व धोक्यात आले आहे. तसेच या गाळामुळे भाविकांची मोठी गैरसोय होत आहे.

या तलावातील पाणी ३० ते ४० फूट मागे सरकल्यामुळे अस्थी विसर्जनासाठी येणाऱ्या नागरिकांना तलावाच्या मध्यभागी जाणे शक्य होत नाही. परिणामी अनेकांना किनाऱ्यालगत तयार झालेल्या छोट्याशा डबक्यातच धार्मिक विधी पार पाडावे लागत आहेत. त्यामुळे भाविकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून तलावातील गाळ नियमितपणे वर्षांपासून काढलेला नाही. पावसाळ्यात वाहून येणारी माती तलावात साचत गेल्याने तलावाची खोली कमी झाली आहे. यामुळे तलावाचे नैसर्गिक स्वरूपही बदलले आहे.

# जामिनावर सुटलेल्या बलात्कारी आरोपीची मिरवणूक काढली

■ गाझियाबाद

**बलात्काराचा** आरोपी जामिनावर सुटल्यानंतर काही जणांनी त्याच्या गळ्यात हार घालत आणि पुष्पवर्षाव करत त्याची मिरवणूक काढल्याची संतापजनक घटना उत्तर प्रदेशमधील गाझियाबाद येथे घडली आहे. याबाबतचा व्हिडिओ प्रसारित झाल्यानंतर अनेकांनी उत्तर प्रदेश पोलिसांवर टीका केली आहे. सुशील प्रजापती असे या आरोपीचे नाव असून तो हिंदू युवा वाहिनीचा माजी सदस्य आहे. कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थिनीवर बलात्कार केल्याचा त्याच्यावर आरोप आहे. एका वकिलाची ओळख करून देतो असे सांगून त्याने संबंधित विद्यार्थिनीला एका घरात नेले आणि तिच्यावर अत्याचार केला, असे पोलिसांनी दाखल केलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

# पंढरीत दर्शन रांगेत भक्तांसाठी पाण्याची तुषार फवारणी यंत्रणा

■ पंढरपूर

**लाखो** भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पंढरपूरच्या विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरातील तापमान वेगाने वाढत आहे. या वाढत्या तापमानामुळे दर्शनासाठी आलेले भाविकही हैराण होत आहेत. त्यामुळे तासनतास रांगेत उभारणाऱ्या भाविकांना उकाड्यापासून दिलासा मिळावा, म्हणून श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीने दर्शन रांगेत ठराविक ठिकाणी स्प्रिंकलर अर्थात तुषार फवारणी यंत्रणा बसविली आहे.

दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेण्यासाठी दररोज हजारो भाविक येतात. सध्या अधिक मास सुरू झाला आहे.

या महिन्यानिमित्त विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेण्यासाठी पंढरपुरात भाविकांची संख्या वाढताना दिसत आहे. त्याचप्रमाणे वाढत्या उन्हामुळे तापमानही वाढत आहे. या वाढत्या तापमानाचा दर्शन रांगेत उभारलेल्या भाविकांना कोणताही त्रास होऊ नये, याची दक्षता मंदिर समितीने दर्शन रांगेत उड्डाणपुलाजवळ तुषार फवारणी यंत्रणा बसविली आहे.

# नालेसफाईवेळी नाल्यात रिक्षाचा सांगाडा सापडला

■ मुंबई

**सध्या** मुंबईतील अनेक भागात पावसाळापूर्व नालेसफाईची कामे सुरू आहेत. ही कामे सुरू असताना चांदिवली परिसरात नाल्यात चक्क एका रिक्षाचा सांगाडा व पालिकेची भलीमोठी लोखंडी कचरापेटी सापडली आहे.

चांदिवलीत टिळकनगर आणि सत्यनगरमध्ये नालेसफाईचे काम सुरू होते. यावेळी नाल्यात काहीतरी मोठी वस्तू अडकल्याची जाणीव कंत्राटदाराला झाली. मग चाचपणी केली असता



रिक्षाचा सांगाडा नाल्यात टाकण्यात आल्याचे लक्षात आले. पालिका अधिकाऱ्यांना याची माहिती दिली गेली आणि अधिकारीही तातडीने घटनास्थळी पोहोचले. पालिका कर्मचाऱ्यांच्या मदतीने या वस्तू बाहेर काढल्या. रिक्षाचा सांगाडा बाहेर काढल्यानंतर नाल्याचा प्रवाह पुन्हा सुरळीत झाला. आता बाहेर काढण्यात आलेल्या रिक्षाच्या नंबरप्लेटवरुन रिक्षा कुणाची आहे? तिचा मालक कोण आहे? याची तपासणी केली जाणार आहे.

# ठाण्यातील बॅडमिंटन हॉलचा खर्च ११.०७ कोटींनी वाढला

**वाढीव खर्चाचा प्रस्ताव पालिका महासभेत सादर**

■ ठाणे

**ठाणे** महापालिकेने दादोजी कोंडदेव स्टेडियममधील 'खंडू रांगणेकर बॅडमिंटन हॉल'चा विस्तार आणि अद्ययावत क्रीडा संकुल उभारण्याचे काम सुरू आहे. मात्र या प्रकल्पासाठी आधी मंजूर झालेल्या खर्चात आता तब्बल ११.०७ कोटींची वाढ करण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. हा प्रस्ताव पालिकेच्या महासभेत सादर करण्यात आला आहे.

सुरुवातीला या प्रकल्पासाठी ४१.६४ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता होती. त्यानंतर मे.शेठ कन्स्ट्रक्शन कंपनीला ७.२० टक्के वाढीव दराने ४४.४५ कोटी रुपयांचे काम दिले. काम सुरू झाल्यानंतर या इमारतीची मजबुती अपुरी असल्याचा अहवाल समोर आल्यानंतर हा खर्च ५५.५२ कोटींवर नेण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. विशेष म्हणजे बाजारभावानुसार प्रति चौरस फूट नवीन कामासाठी ५ हजार रुपये दर असताना या बॅडमिंटन हॉलच्या नूतनीकरणासाठी प्रती चौरस फूट ९ हजार रुपये दर आकारले आहे. या वाढीव खर्चात नवीन वास्तु बांधून तयार होईल, असा दावा भाजपाने केला आहे.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# तरीही जगात हिंसाचार

संपूर्ण विश्वाचा विचार केला तर त्याला नेमकी कोणत्या गोष्टीची गरज आहे, असा प्रश्न उपस्थित करण्याची वेळ आलेली आहे. आजच्या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात भौतिक प्रगती अमर्याद स्वरूपात सुरू आहे. या प्रगतीला कोणत्याही मर्यादा नाहीत. येणारे कृत्रिम बुद्धिमत्तेचे युग काय काय परिणाम घडवेल याचा कोणताही भरोसा नाही. हुबेहुब कृत्रिम प्रतिसृष्टी निर्माण करण्याची क्षमता या तंत्रज्ञानामध्ये आहे. प्राचीन काळापासून मनुष्य सुखाचाच शोध घेत आला आहे. परंतु नेमके सुख कोणते, याचा त्याला अजूनही खऱ्या अर्थाने शोध लागलेला नाही. विज्ञान तंत्रज्ञानातून उपलब्ध होणाऱ्या सगळ्या सोयीसुविधा आणि कमी श्रमामध्ये अधिकाधिक सुख उपभोगण्याची लालसा त्यासाठी मनुष्याची सुरू असलेली धडपड हीच सगळ्या जगाची गरज आहे, अशी ठाम समजूत करून घेतली जात आहे. एकेकाळी जगापुढे भाकरीचा प्रश्न होता. प्रत्येकाच्या पोटाला पुरेसे अन्न हीच जगाची खरी गरज मानली गेली होती. परंतु त्याबाबतचाही भ्रमनिरास झाला. भाकरी मिळाली तरी बुद्धी किंवा शाबूत ठेवण्याची समस्या प्रत्येकालाच भेडसावत ठेवली, त्यातूनच अनेक प्रकारचे युद्ध आणि संघर्ष उभे ठाकले. माणुसकी, मानवता या गोष्टी विसरून केवळ आपले वर्चस्व निर्माण करण्याची स्पर्धा सुरू झाली. विज्ञान तंत्रज्ञानाच्या साहाय्याने वर्चस्व निर्माण करणारी साधने आणि शस्त्रसामुग्री तयार झाली. मग समुद्रात तरंगणाऱ्या अवाढव्य जहाजांपासून ते आकाशात प्रचंड वेगाने क्षेपणास्त्राचा मारा करणाऱ्या सुपरसॉनिक विमानांपर्यंत हा प्रवास चालूच राहील. पहिले महायुद्ध, दुसरे महायुद्ध आणि त्यातून प्रचंड नरसंहारही सगळ्या जगाने अनुभवला. त्यानंतर माणसेच माणसाला इतक्या क्रूरपणे मारतात. म्हणजेच मानवी मूल्यांचीच हत्या घडून येते. अशा प्रकारची जाणीव अतिशय छोट्या स्वरूपात व्यक्त झाली. प्रगती, विकास, वर्चस्व ही काही विश्वाची खरी ओळख ठरणार नाही. मानवी मूल्य जपली जाणे आणि मानवी संस्कृतीचा वारसा जतन करणे तितकेच आवश्यक आहे याची तीव्रता जगातल्या अनेक देशांना वाटली आणि त्यातूनच युनेस्कोने जागतिक सांस्कृतिक दिवसाची घोषणा केली. याच दिवसाला सांस्कृतिक विविधता दिवस म्हणून ओळखले जाते.

**जागतिक सांस्कृतिक दिनाचे औचित्य**

युनेस्कोने २००२ मध्ये या सांस्कृतिक विविधता दिनाची आवश्यकता जगाला पटवून दिली. आता प्रत्यक्षात या दिवसानिमित्ताने जगात किती सांस्कृतिक मूल्य जपली जातात किंवा असलेल्या विविधतेचा किती अभिमान बाळगला जातो. हे कळायला मार्ग नाही. परंतु प्रामुख्याने संवादातून मानवी जीवनाला आवश्यक असलेली ही सांस्कृतिक मूल्य निश्चितपणे जतन करण्याची आवश्यकता आहे आणि सामाजिक जीवनाला एकत्र बांधून ठेवणारी विविधता तितक्याच गौरवाने सांगण्याची गरज आहे. दुर्दैवाने आज जगात अनेक ठिकाणी असलेली युद्धजन्य परिस्थिती त्यातून घडून आलेला हिंसाचार, हजारो निष्पाप लोकांचे गेलेले बळी एवढेच नव्हे तर अगदी दैनंदिन जीवनामध्ये सगळ्या देशांमध्ये प्रचंड प्रमाणावर हिंसाचार सुरू असतो. बदलत्या काळानुसार म्हणजेच जगात साक्षरता वाढते आहे. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आधुनिकता येते आहे. व्यक्तिगत स्वार्थासाठी हिंसाचार करण्याची किंवा लुबाडण्याची पूर्वीसारखी परिस्थिती आता राहिलेली नाही. तरीदेखील हिंसाचार कमी होण्याची चिन्हे दिसत नाहीत. अशा परिस्थितीत जगानेच एकत्र येऊन निश्चित केलेला सांस्कृतिक विविधता दिवस अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतो. जगातील सगळी विकसित राष्ट्र वारंवार लोकशाहीचा, मानवी स्वातंत्र्याचा, मानवाधिकारांचा ढोल पिटत असतात. परंतु त्यांच्याच देशांमध्ये यातली बरीच मूल्य पायदळी तुडवली जातात. आजचे जग हे आर्थिक युग आहे. प्रत्येक देशात आपल्या भौगोलिक सीमांपेक्षाही आर्थिक व्यापाराच्या विस्तारामध्ये जास्त स्वारस्य आहे. जगाबरोबरचे संबंध टिकवण्याचा प्रयत्न होत असतो. परंतु केंद्रस्थानी व्यापारउद्योग, हाच प्रकार जास्त पाहायला मिळतो. जगातल्या सगळ्या राष्ट्रांनी एकत्र येऊन सगळ्याच जगासाठी आवश्यक असलेली मानवी संस्कृतीची मूल्य अधिक प्रभावीपणे जपली पाहिजेत. सांस्कृतिक देवाणघेवाण आणि समाजजीवनासाठी आवश्यक असलेली विविधता समजून घेतली पाहिजे. केवळ भौतिक प्रगतीतून विकासाची व्याख्या परिपूर्ण होत नाही. विकासाच्या संकल्पनेमध्ये मानवी जीवनाची समृद्धता अधिक महत्त्वाची ठरते.

**भारताकडे असलेली विविधता**

आजच्या या जागतिक सांस्कृतिक विविधता दिनानिमित्ताने भारतातसुद्धा विशेष उपक्रम सुरू होणे आवश्यक आहे. कारण भारत हा जगातील असा एकमेव देश ठरतो की, जिथे प्राचीन संस्कृती हजारो वर्षापासून नांदत आली. विश्वबंधुत्वाची किंवा विश्व हे एकच कुटुंब आहे. अशा प्रकारचा व्यापक विचार जगाला देण्याचे काम भारतातून झालेले आहे. जगाच्या अनेक भागातून आलेल्या वेगवेगळ्या समुदायांना सामावून घेण्याचे काम भारतात सर्वाधिक झाले म्हणूनच इथे अनेक धर्म, संप्रदाय, जाती-जमाती, शेकडो भाषा आणि त्यांच्याच शेकडा लोकसंस्कृती सुखाने नांदत असतात. म्हणूनच आजचा हा सांस्कृतिक विविधता दिवस खूप मोठ्या गर्वाने साजरा करण्याचा नैतिक अधिकार भारताला आपोआप प्राप्त होतो. विविधतेमध्ये कशी विलक्षण एकता साधली जाऊ शकते. याचे अप्रतिम उदाहरण म्हणजे भारतातील समाजजीवनात वेगवेगळी राज्य, वेगवेगळी भाषा असूनही एक राष्ट्र म्हणून त्यांच्याकडून होणारे व्यवहार हे जगासाठी आदर्श ठरू शकतात. भारताला लाभलेली प्राचीन स्वरूपाची आध्यात्मिक देणगी आजही जगाचे आकर्षण ठरते. जगाच्या कल्याणासाठी भारताने नेहमीच पुढाकार घेतलेला आहे. भारताने कधीही कोणावर स्वतःहून आक्रमण केलेले नाही. कारण विश्वशांती हेच भारताचे नेहमी उद्दीष्ट राहिले आहे. अशावेळी या जागतिक सांस्कृतिक आणि विविधता दिनाचे औचित्य साधून भारताने आपल्याकडे असलेल्या सांस्कृतिक मूल्यांचा आणि विविधतेचा जगाला वारंवार गौरवाने परिचय करून दिला पाहिजे.

## सुविचार

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

विष व शब्द एकाच ताकदीचे आहेत. विषाचा एक थेंब जरी शरीरात गेला तर तो जीवन संपवितो आणि चुकीचा एक शब्द जरी कानात पडला की तो मोठ-मोठी नाती संपवितो.

## पंचांग

गुरुवार, २१ मे २०२६
शक १९४८ पराभवनामसंवत्सर
* अधिक ज्येष्ठ शुक्ल पंचमी
* नक्षत्र : पुष्य
-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० कर्क

रवी उदय- ०६-०४
रवी अस्त- १९-०७

मिथुनायन सकाळी ६.०७, गुरुपुष्यामृत सूर्योदयापासून, उत्तर रात्री २.४९ पर्यंत

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०, जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९, छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)


## पाककृती

# डोडा बर्फी

**डोडा बर्फी हा दिल्ली आणि हरियाणाचा एक गोड पदार्थ आहे. तो मोड आलेल्या गव्हापासून बनवला जातो. तो चविष्ट असतो. तो अगदी सोप्या पद्धतीने तयार केला जातो.**

★ **साहित्य :** ४ कप दूध, १.५ कप ताजी मलई (फ्रेश क्रीम), ३ मोठे चमचे ओटमील, २ कप साखर, १ मोठा चमचा शुद्ध तूप, १ कप बदाम (बारीक चिरलेले), १ कप काजू (बारीक कुटलेले), २ मोठे चमचे पिस्ते (लांब तुकडे केलेले), २ मोठे चमचे कोको पावडर.

★ **कृती :** एका पातेल्यात तूप घाला. तूप गरम झाल्यावर त्यात ओटमील घालून मध्यम आचेवर हलका तपकिरी रंग येईपर्यंत परता. यानंतर ते काढून बाजूला ठेवा. आता दुसऱ्या पातेल्यात



दूध घालून मध्यम आचेवर उकळवा. दूध उकळल्यावर त्यात मलई घाला. दूध घट्ट होईपर्यंत उकळवा. या संपूर्ण प्रक्रियेला सुमारे ४५ मिनिटे लागतील. या दरम्यान दूध भांड्याला चिकटल्यास, ते चमच्याने काढत राहा. आता तयार केलेल्या दुधात ओटमील आणि साखर घालून चांगले मिसळा. ते आणखी २० मिनिटे शिजू द्या. या दरम्यान, दूध भांड्याच्या कडांना चिकटू नये म्हणून चमच्याने सतत ढवळत राहा. आता त्यात काजू, बदाम आणि कोको पावडर घाला. त्याचा मोठा गोळा होईपर्यंत किंवा दुधातून तूप सुटेपर्यंत ते शिजवा. या प्रक्रियेला सुमारे १५ मिनिटे लागतील. आता एक ट्रे किंवा प्लेट घ्या आणि त्यावर तूप लावा. तयार केलेले मिश्रण त्यावर व्यवस्थित पसरवा. नंतर त्याचे बर्फीच्या आकाराचे तुकडे करा. यानंतर, त्यावर पिस्ते घाला आणि चमच्याने हलकेच दाबा. अशाप्रकारे, तुमची डोडा बर्फी घरी तयार आहे. आता, थंड झाल्यावर ती घरातील सदस्यांना किंवा पाहुण्यांना वाढा.

## क्रीडा

# गिलच्या गुजरातची क्वालिफायर-१ च्या दिशेने कूच
## चेन्नईला अस्तित्व टिकवण्याचे आव्हान

**आयपीएल सामन्यात गुणतालिकेतील अव्वल दोन स्थान पक्के करून क्वालिफायर-१ मध्ये धडक मारण्याच्या निर्धाराने गुजरात टायटन्स उद्या मैदानात उतरणार आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुजरातसमोर चेन्नई सुपर किंग्सचे आव्हान असणार आहे. तरी दोन्ही संघांची परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे. शुभमन गिलच्या नेतृत्वात गुजरातचा आत्मविश्वास उंचावलेला असताना, पाच वेळचा विजेता चेन्नई मात्र प्लेऑफच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी अरवेरची झुंज देणार आहे. त्यामुळे 'टॉप-२ 'चे समीकरण आणि चेन्नईचे अस्तित्व या दुहेरी पार्श्वभूमीवर हा सामना अधिकच रंगतदार ठरणार आहे.**



■ अहमदाबाद

१६ गुणांसह दुसऱ्या स्थानावर असलेल्या गुजरात टायटन्स संघासाठी चेन्नई सुपर किंग्स विरुद्धचा सामना 'टॉप-२'मध्ये स्थान पक्के करण्यासाठी निर्णायक ठरणार आहे. विजय मिळाल्यास गुजरातच्या क्वालिफायर-१ च्या आशा अधिक मजबूत होतील. दुसरीकडे, आरसीबी आणि सनराईजर हैदराबाद यांच्यासोबत नेट रनरेटची चुरसही रंगली आहे. चेन्नईसाठी मात्र हा सामना प्रतिष्ठा आणि अस्तित्व टिकवण्याची अखेरची संधी आहे. ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखालील संघाला प्लेऑफच्या आशा कायम ठेवण्यासाठी विजय अनिवार्य आहे. अहमदाबादच्या फलंदाजांसाठी पोषक खेळपट्टीवर शुभमन गिल आणि जोस बटलर यांच्यावर गुजरातची भिस्त असेल, तर चेन्नईकडून अकिल हुसेन सुरुवातीच्या षटकांत निर्णायक ठरू शकतो.

मधल्या षटकांमध्ये रशीद खान आणि चेन्नईच्या फलंदाजांमधील सामना निर्णायक ठरू शकतो. गुजरातचा स्टार फिरकीपटू सातत्याने दबाव निर्माण करत असून, त्याच्या गोलंदाजीसमोर चेन्नईची फलंदाजी किती टिकते यावर सामन्याचे चित्र अवलंबून राहील. चेन्नईकडून संजू सॅमसन याच्याकडून मोठ्या खेळीची अपेक्षा असेल. रशीदच्या मनगटी फिरकीवर मात करण्याची त्याची क्षमता सीएसकेसाठी महत्त्वाची ठरू शकते. मात्र दुखापती आणि गोलंदाजीत सातत्य नसल्याने चेन्नईचा हंगाम अडचणीत गेला आहे. दोन्ही संघांतील आमनेसामन्याचा विक्रम ४-४ असा बरोबरीत असला, तरी सध्या गुजरात टायटन्सचे पारडे जड आहे. संतुलित गोलंदाजी आणि दमदार फार्मच्या जोरावर गुजरात आत्मविश्वासाने मैदानात उतरेल, तर चेन्नई सुपर किंग्स प्रतिष्ठा आणि उरलेल्या आशा कायम ठेवण्यासाठी सर्वस्व पणाला लावणार आहे.

# माझे शरीर थोडे कमजोर आहे
## धोनीच्या निवृत्तीवर रैनाचा खुलासा

■ नवी दिल्ली

**क्रिकेटपटू** सुरेश रैनाने माजी कर्णधार एम.एस धोनी याच्या आयपीएल निवृत्तीबाबत खुलासा केला. चेन्नई आणि हैदराबाद सामन्यानंतर बोलताना रैनाने सांगितले की, धोनी अजूनही पुढील हंगामात खेळण्याबाबत सकारात्मक आहे. मात्र दुखापतीमुळे त्याला शारीरिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

रैना म्हणाला की, मी त्याला सांगितले की, पुढील आयपीएलला 'मिस्ड कॉल' समजू नकोस. तुला पुढच्या वर्षीही खेळायचे आहे. त्यावर धोनीने, माझे शरीर थोडे कमजोर आहे, असे उत्तर दिले. मात्र रैनानेही लगेच त्याला निवृत्तीचा विचार न करण्याचा सल्ला दिला.

# पाकच्या पराभवाचा भारताला फटका
## डब्ल्यूटीसीत टीम इंडिया घसरली

■ नवी दिल्ली

**बांगलादेश** क्रिकेट संघ विरुद्धच्या कसोटी मालिकेत पाकिस्तान संघाचा पराभव झाला. परंतु पाकची ही हार भारतीय संघाला महागात पडली. बांगलादेशने मालिकेत २-० असा ऐतिहासिक विजय मिळवला. यामुळे डब्ल्यूटीसीच्या शर्यतीत भारतीय संघ एका स्थानाने खाली घसरला.

दुसऱ्या कसोटीत बांगलादेशने पाकिस्तानचा ७८ धावांनी पराभव केला. याआधी पहिल्या सामन्यातही त्यांनी १०४ धावांनी विजय मिळवला होता. या दोन विजयांमुळे बांगलादेशने गुणतालिकेत मोठी झेप घेत भारताला मागे टाकले. सध्या बांगलादेशचे चार कसोटी सामन्यांत दोन विजय, एक पराभव आणि एक बरोबरीसह ५८.३३ टक्के गुण आहेत. तर भारताने नऊ कसोटी सामने खेळून चार विजय, चार पराभव आणि एक बरोबरी नोंदवली असून त्यांचे ४८.१५ टक्के गुण आहेत.

शुभमन गिलच्या नेतत्त्वाखालील भारतीय संघाने यावर्षी अद्याप कसोटी सामना खेळलेला नाही. भारत ६ जूनपासून अफगाणिस्तान विरुद्ध एकमेव कसोटी खेळणार आहे. पण तो सामना जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचा भाग नाही.

# मनगटाच्या दुखापतीमुळे अल्काराझची विम्बल्डन टेनिस स्पर्धेतून माघार

■ लंडन

**टेनिस** विश्वाला मोठा धक्का देणारी बातमी समोर आली आहे. स्पेनचा स्टार खेळाडू आणि दोन वेळचा विम्बल्डन विजेता कार्लोस अल्काराझ याने मनगटाच्या दुखापतीमुळे यंदाच्या विम्बल्डन अजिंक्यपद टेनिस स्पर्धेतून माघार घेतली आहे. याआधीच त्याने फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेतूनही माघार घेतली होती.

अल्काराझला गेल्या महिन्यात बार्सिलोना खुली टेनिस स्पर्धेदरम्यान उजव्या मनगटाला दुखापत झाली होती. सुरुवातीला ही दुखापत किरकोळ असल्याचे मानले जात होते, मात्र पुनर्प्राप्ती अपेक्षेपेक्षा संथ गतीने होत असल्याने अखेर त्याने



विम्बल्डनमधूनही माघार घेण्याचा कठीण निर्णय घेतला. समाज माध्यमांवर भावना व्यक्त करताना अल्काराझने सांगितले की, माझी प्रकृती सुधारत आहे आणि मला खूप बरे वाटत आहे. पण दुर्दैवाने मी अजूनही पूर्ण क्षमतेने खेळण्यासाठी तयार नाही.

गेल्या दोन वर्षांत कार्लोस अल्काराझने गवतावरील कोर्टवर शानदार वर्चस्व गाजवत सलग दोन वेळा विम्बल्डन विजेतेपद जिंकले होते. विशेष म्हणजे दोन्ही अंतिम सामन्यांत त्याने नोव्हाक जोकोविचचा पराभव करत स्वतः ची वेगळी ओळख निर्माण केली होती. यावर्षीही त्याने ऑस्ट्रेलियन खुली टेनिस स्पर्धा जिंकून कारकिर्दीतील चारही प्रमुख ग्रँडस्लॅम स्पर्धांवर नाव कोरले आणि अशी कामगिरी करणारा सर्वात तरुण पुरुष खेळाडू ठरला. त्यामुळे फ्रेंच ओपन आणि विम्बल्डनमध्ये तो प्रमुख दावेदार मानला जात होता.

# महिला खेळाडूंचे गुप्त चित्रीकरण करणाऱ्या प्रशिक्षकावर आजीवन बंदी

■ प्राग

**युरोपियन** फुटबॉलमध्ये खळबळ उडवणाऱ्या प्रकरणात पेट्र व्लाचोव्स्की या महिला फुटबॉल प्रशिक्षकावर आजीवन बंदी घालण्यात आली आहे. खेळाडूंच्या बदल कक्षात गुप्तपणे चित्रीकरण केल्याप्रकरणी युरोपियन फुटबॉल महासंघाने कठोर कारवाई केली.

युएफएच्या नियंत्रण, नीतिमत्ता आणि शिस्तपालन समितीने या प्रकरणाची चौकशी केल्यानंतर व्लाचोव्स्की यांच्यावर फुटबॉलशी संबंधित कोणत्याही कामात आयुष्यभर सहभागी होण्यास बंदी घालण्याचा निर्णय जाहीर केला. तसेच ही बंदी जागतिक स्तरावर लागू करण्यासाठी फिफा डे शिफारस करण्यात आली आहे. याशिवाय झेक प्रजासत्ताक फुटबॉल संघटनेला त्यांचा प्रशिक्षण परवाना रद्द करण्याचे निर्देशही दिले.

मे २०२५ मध्ये न्यायालयाने व्लाचोव्स्की यांना दोषी ठरवले होते. त्यांनी एफसी स्लोव्हाको महिला फुटबॉल क्लब संघातील महिला खेळाडूंच्या बदल कक्षात गुप्त चित्रीकरण केल्याचे उघड झाले होते. या प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे प्रभावित खेळाडूंमध्ये १७ वर्षीय अल्पवयीन खेळाडूचाही समावेश होता.

# ८२ व्या वर्षी बिली जीन किंगची पदवी पूर्ण! ६५ वर्षांनंतर स्वप्नपूर्ती

■ लॉस एंजेलिस

**टेनिस** कोर्टवर अनेक ऐतिहासिक विक्रम करणाऱ्या बिली जीन किंग यांनी आता शिक्षण क्षेत्रातही प्रेरणादायी कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तब्बल ६५ वर्षांपूर्वी सुरू केलेले महाविद्यालयीन शिक्षण त्यांनी अखेर पूर्ण केले. वयाच्या ८२ व्या वर्षी त्यांनी पदवी प्राप्त केली. त्यांच्या या यशामुळे जगभरातील क्रीडाप्रेमी आणि विद्यार्थ्यांमध्ये कौतुकाची लाट पसरली आहे.

आयोजित विशेष समारंभात कॅलिफोर्निया स्टेट विद्यापीठ, लॉस एंजेलिस या विद्यापीठाने बिली जीन किंग यांना इतिहास विषयातील कला शाखेची पदवी प्रदान केली. पदवी स्वीकारताना त्यांनी आनंद व्यक्त करत हात वर करून जल्लोष केला.



# २२ वर्षांनंतर आर्सेनलचा जल्लोष
## प्रीमियर लीगचे विजेतेपद पटकावले

■ लंडन

तब्बल २२ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर आर्सेनलने अखेर इंग्लंडमधील सर्वात प्रतिष्ठेच्या फुटबॉल स्पर्धेचे विजेतेपद आपल्या नावावर करत इतिहास घडवला. अखेरच्या काही हंगामांपासून विजेतेपदाच्या अगदी जवळ येऊनही अपयश पत्करणाऱ्या संघाने यावर्षी मात्र सातत्यपूर्ण आणि आक्रमक खेळाच्या जोरावर संपूर्ण स्पर्धेत वर्चस्व राखले. प्रशिक्षक मिकेल आर्टेटाच्या मार्गदर्शनाखाली युवा आणि अनुभवी खेळाडूंच्या सुरेख संगमाने संघाला नवचैतन्य मिळाले आणि त्याचेच रुपांतर ऐतिहासिक यशात झाले.

गतविजेत्या मँचेस्टर सिटीला निर्णायक सामन्यात विजय मिळवण्यात अपयश आल्याने आर्सेनलच्या विजेतेपदावर शिक्कामोर्तब झाले. सामना बरोबरीत सुटताच आर्सेनलच्या चाहत्यांनी जल्लोषाला सुरुवात केली. लाल-पांढऱ्या रंगात रंगलेल्या हजारो समर्थकांनी गाणी, घोषणाबाजी आणि फटाक्यांच्या आतषबाजीत हा ऐतिहासिक क्षण साजरा केला. २००४ नंतर प्रथमच इंग्लंडच्या फुटबॉलवर पुन्हा एकदा आर्सेनलचे वर्चस्व प्रस्थापित झाल्याने क्लबच्या इतिहासात या विजयाची सुवर्णाक्षरांनी नोंद झाली. गतविजेत्या मँचेस्टर सिटी फुटबॉल क्लबला एएफसी बोर्नमाउथ संघाने १-१ अशा बरोबरीत रोखताच आर्सेनल फुटबॉल क्लबच्या विजेतेपदावर शिक्कामोर्तब झाले. बोर्नमाउथच्या युवा खेळाडू एली ज्युनियर क्रुपी याने केलेल्या शानदार गोलमुळे सिटी अडचणीत आली. नंतर एर्लिंग हालांड याने बरोबरी साधली, मात्र विजय मिळवण्यात सिटी अपयशी ठरली आणि आर्सेनलचा जल्लोष सुरू झाला.

## ‘पेद्दी’ सर्वांत मोठ्या स्क्रीनवर

दाक्षिणात्य सुपरस्टार राम चरण याचा नवा चित्रपट ‘पेद्दी’ लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. मुंबईत झालेल्या एका मोठ्या कार्यक्रमात या चित्रपटाचा ट्रेलर दाखवण्यात आला. हा चित्रपट मोठ्या पडद्यावर खूप भव्य दिसणार आहे आणि चाहत्यांसाठी आनंदाची गोष्ट म्हणजे हा चित्रपट ‘आयमॅक्स’ या सर्वात मोठ्या आणि चांगल्या स्क्रीनवर पाहता येणार आहे.



‘पेद्दी’ प्रदर्शित झाल्यानंतर लगेचच पुढच्या दिवशी, म्हणजेच ५ जून रोजी ‘मास्टर्स ऑफ द युनिव्हर्स’ हा प्रसिद्ध हॉलिवूड चित्रपटही आयमॅक्स स्क्रीनवर येत आहे. हा चित्रपट लहान मुलांचा आवडता हिरो ‘ही-मॅन’ याच्या कथेवर आधारित आहे. ‘पेद्दी’ चित्रपटाचे दिग्दर्शन बुची बाबू सना यांनी केले असून यात राम चरणसोबत अभिनेत्री जान्हवी कपूर मुख्य भूमिकेत आहे. या चित्रपटाला प्रसिद्ध संगीतकार ए.आर.रहमान यांनी संगीत दिले आहे.

## तब्बूचे ‘सोनेवाटप!’

दिग्दर्शक गोविंद निहलानी यांच्या ‘तक्षक’ चित्रपटातील ‘रंग दे’ हे गाणे बॉलिवूडमधील अत्यंत लोकप्रिय गाण्यांपैकी एक मानले जाते. या गाण्याच्या चित्रीकरणादरम्यानचा एक अत्यंत रंजक आणि हृदयस्पर्शी किस्सा प्रसिद्ध डान्स आर्टिस्ट रुबीना खान यांनी एका मुलाखतीत शेअर केला आहे. हे गाणे पूर्ण झाल्यानंतर अभिनेत्री तब्बूने कोरिओग्राफर सरोज खान आणि त्यांच्या संपूर्ण टीमला सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम देऊन चकित केले होते.

रुबीना यांनी सांगितले की, सरोज खान यांनी या गाण्यासाठी अत्यंत कठीण स्टेप्स बसवल्या होत्या. तब्बूचे शरीर डान्ससाठी फारसे लवचिक नसल्यामुळे तिला या स्टेप्स आत्मसात करण्यासाठी प्रचंड मेहनत घ्यावी लागली. सरावाच्या वेळी तब्बू एकदाही विश्रांतीसाठी खाली बसली नाही आणि अवघ्या चार ते पाच दिवसांत तिने हे गाणे पूर्ण केले.



गाण्याचे अंतिम रूप पाहिल्यानंतर तब्बूचा आनंद गगनात मावेनासा झाला. तिने आपला आनंद आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मास्टर सरोज खान यांना सोन्याच्या बांगड्या भेट दिल्या. एवढेच नव्हे तर, सरोज खान यांच्या पुरुष सहाय्यकाला सोन्याची चेन आणि महिला सहाय्यकाला सोन्याचे ब्रेसलेट देऊन तिचा आनंद साजरा केला. एखाद्या मुख्य अभिनेत्रीने डान्स टीमचे अशाप्रकारे कौतुक करण्याची ही पहिलीच वेळ असल्याचे रुबीना यांनी आवर्जून सांगितले.

## उत्सुकता ‘सैराब’ची

स्टार प्लस या वाहिनीने त्यांच्या आगामी ‘सैराब’ या मालिकेच्या प्रक्षेपणाची तारीख अधिकृतपणे जाहीर केली आहे. ही मालिका येत्या २ जून २०२६ पासून संध्याकाळी ७ वाजून ३० मिनिटांनी प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या मालिकेचे शीर्षक समोर आल्यापासूनच प्रेक्षकांमध्ये याच्या कथानकाबद्दल उलटसुलट चर्चा सुरू होत्या. वाहिनीने नुकतेच याचे प्रोमो प्रदर्शित करून प्रेक्षकांची उत्सुकता आणखी वाढवली आहे. ही मालिका मानवी भावना, गुंतागुंतीची नाती आणि कौटुंबिक मूल्यांवर प्रकाश टाकणारी असेल, असा विश्वास निर्मात्यांनी व्यक्त केला आहे. निर्मात्यांनी मालिकेची मुख्य स्टारकास्ट आणि मूळ कथानक याबद्दल कमालीची गुप्तता बाळगली आहे. मुख्य भूमिकेत कोण असणार, याबद्दल अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. या गुप्ततेमुळे मनोरंजन विश्वात आणि प्रेक्षकांमध्ये या मालिकेविषयीची उत्सुकता अधिकच वाढली आहे. दर्जेदार आणि भावनिक कौटुंबिक नाट्याची आवड असणाऱ्या प्रेक्षकांसाठी ही मालिका एक उत्तम पर्याय ठरेल, अशी चिन्हे आहेत.



## लग्नाबाबत मी व्यावहारिक : सारा



अभिनेत्री सारा अली खान सध्या तिच्या ‘पती पत्नी और वो २’ या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने दिलेल्या एका मुलाखतीत तिने लग्न, करिअर आणि वैयक्तिक आयुष्याबद्दल अत्यंत मोकळेपणाने आणि व्यावहारिक विचार मांडले आहेत. आपल्या अवतीभवतीच्या परिस्थितीमुळे आणि अनुभवांमुळे माणसाचे विचार घडतात, असे मत साराने व्यक्त केले. वैयक्तिक आयुष्यात नाती तुटताना आणि लग्न अयशस्वी होताना पाहिल्यामुळे लग्नाकडे पाहण्याचा तिचा दृष्टिकोन अत्यंत व्यावहारिक बनला आहे. कोणत्याही सामाजिक दबावाखाली येऊन घाईघाईने लग्न करण्यापेक्षा योग्य जोडीदाराची प्रतीक्षा करणे अधिक सोयीचे असते, असे ती मानते. घाईचे काम हे नेहमीच नुकसानकारक ठरू शकते, यावर तिचा विश्वास आहे. लग्नाविषयी बोलताना तिने स्पष्ट केले की, स्वतःमधील रिकामी जागा भरून काढण्यासाठी किंवा स्वतःला पूर्ण करण्यासाठी जोडीदाराची गरज भासणे हे नाते टिकवण्यासाठी योग्य नाही. मी स्वतः भावनिकदृष्ट्या सक्षम असून मला कधी अपूर्ण वाटत नाही. सध्या मी संपूर्ण लक्ष केवळ स्वतःच्या प्रगतीवर आणि करिअरवर केंद्रित केले आहे. भविष्यात माझ्या अस्तित्वाचा आदर करणारा, कौतुक करणारा भेटला तरच मी या विचाराचा स्वीकार करेन, असे ती सांगते.

## कुणालच्या ‘वाईब’ मधून प्रितीचे पुनरागमन

अभिनेता आणि दिग्दर्शक कुणाल खेमू याच्या दिग्दर्शनाखाली साकारत असलेल्या ‘वाईब’ या आगामी चित्रपटाची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. ‘मडगाव एक्स्प्रेस’ या पहिल्या चित्रपटाच्या यशानंतर कुणाल खेमू दिग्दर्शक म्हणून हा दुसरा चित्रपट घेऊन येत आहे. ॲमेझॉन एमजीएम स्टुडिओजची निर्मिती असलेला हा चित्रपट १८ सप्टेंबर २०२६ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून अभिनेता कुणाल खेमू दिग्दर्शन आणि लेखनासोबतच मुख्य भूमिकेतही दिसणार आहे.

या चित्रपटाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे याच्या निमित्ताने अभिनेत्री प्रिती झिंटा दीर्घकाळानंतर मोठ्या पडद्यावर पुनरागमन करत आहे. तिच्यासोबत ‘लापता लेडीज’ फेम अभिनेता स्पर्श श्रीवास्तव आणि नवोदित अभिनेत्री वंशिका धीर हे देखील प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. ड्रोंगो फिल्म्सच्या बॅनरखाली कुणाल खेमू आणि चिराग निहलानी यांनी या चित्रपटाची सहनिर्मिती केली आहे. पहिल्या चित्रपटात प्रेक्षकांना खळखळून हसवल्यानंतर, कुणाल आता या नव्या चित्रपटाच्या माध्यमातून पुन्हा एकदा मनोरंजनाचा एक धमाकेदार प्रवास घेऊन येण्यासाठी सज्ज झाला आहे.




## स्वतःला सतत सिद्ध करावं लागतं : सैफ

अभिनेता सैफ अली खान हा आपल्या अभिनयातील वैविध्यासाठी ओळखला जात असला तरी कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात त्याला एका विशिष्ट चौकटीत पाहिले जात होते. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या ‘कर्तव्य’ या मालिकेच्या प्रमोशनदरम्यान सैफने आपल्या कारकिर्दीतील त्या टप्प्याबद्दल स्पष्टपणे भाष्य केले. गंभीर आणि वास्तववादी भूमिका करण्यासाठी निर्मात्यांना आपण सक्षम आहोत, हे वारंवार पटवून द्यावे लागले, असे त्याने सांगितले.

सैफने एका मुलाखतीत सांगितले की, उद्योगात त्याची प्रतिमा केवळ ‘मेट्रोसेक्शुअल’ किंवा हलक्याफुलक्या रोमॅन्टिक भूमिकांपुरती मर्यादित करण्यात आली होती. त्यामुळे ‘परिणीता’सारख्या चित्रपटासाठीही त्याची सुरुवातीला निवड झाली नव्हती. निर्माता-दिग्दर्शक दुसऱ्या अभिनेत्याचा विचार करत होते. कारकिर्दीत आलेल्या अपयशामुळे दिसणाऱ्या वेदना त्या नायकामध्ये दिसायला हव्यात असे निर्मात्यांना वाटत होते. त्यावर सैफने विनोदी शैलीत प्रश्न विचारला की, एखादी भूमिका मिळवण्यासाठी अपयश अनुभवणे ही पूर्वअट कधीपासून झाली? त्या चर्चेनंतर त्याने स्वतःला ‘शेखर’च्या भूमिकेसाठी योग्य सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आणि अखेरीस त्याला संधी मिळाली. ‘रेस’मध्ये सुरुवातीला त्याला अक्षय खन्नाने साकारलेली व्यक्तिरेखा भूमिका देण्याचा विचार होता. मात्र, सैफने स्वतः पुढाकार घेत अधिक जबाबदार आणि गुंतागुंतीची व्यक्तिरेखा असलेल्या मोठ्या भावाची भूमिका करण्याची इच्छा व्यक्त केली. त्याच्या मते, कलाकार म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी अशा निर्णयांची आवश्यकता असते.



## उत्पन्नवाढीसाठी मुंबई पालिका बाजारात आणणार ‘ग्रीन बॉंड’

### अर्थव्यवस्था ३०० दशलक्ष डॉलरपर्यंत नेण्याचे नियोजन

■ मुंबई

**मुंबई** महानगरपालिका उत्पन्नवाढीसाठी डिसेंबरपर्यंत हरित रोखे (ग्रीन बॉंड) बाजारात आणणार आहे. या हरित रोख्यांच्या विक्रीतून मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणारा निधी पर्यावरणपूरक मोठे प्रकल्प राबवण्यासाठी वापरला जाईल, अशी माहिती पालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी दिली.

मुंबई महानगर प्रदेशची (एमएमआर) अर्थव्यवस्था सध्या १६० दशलक्ष डॉलर असून ती ३०० दशलक्ष डॉलरपर्यंत नेण्याचे नियोजन पालिका प्रशासनाने केले आहे, असेही भिडे यांनी सांगितले.

मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून सध्या विविध विकास प्रकल्प राबवले जात आहेत. या प्रकल्पांसाठी खर्चाचे नियोजन करण्यात येते. गारगाई धरण प्रकल्प, सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पिण्याव्यतिरिक्त वापरासाठी उपलब्ध करून देणे, समुद्राचे खारे पाणी गोडे करणे, वर्सोवा ते दहिसर उन्नत मार्गाची उभारणी असे प्रकल्प सध्या पालिका राबवत आहे.

या प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध व्हावा या उद्देशाने डिसेंबरपर्यंत बाजारात हरित रोखे उपलब्ध करण्यात येतील.त्यासाठी आवश्यक असलेल्या क्रेडिट रेटींग प्रक्रियेसाठी संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष हरित रोखे बाजारात आणले जाणार आहेत,असे भिडे यांनी पुढे सांगितले.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केंद्रीय अर्थसंकल्पात अमृत २.० अभियानांतर्गत हरित रोख्यांना प्रोत्साहन देण्याची घोषणा केली होती. त्याचा आधार घेत पालिकेने हे हरित रोखे बाजारात आणण्याचा निर्णय घेतला आहे.

## नागपुरात विटांनी भरलेला ट्रक उलटला! तिघांचा मृत्यू

■ नागपूर

**नागपूर** जिल्ह्यातील ईसापूरजवळ विटांनी भरलेला आयशर ट्रक उलटला. या दुर्घटनेत तिघांचा जागीच मृत्यू झाला, तर तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. हा ट्रक खापा येथून मोवाडकडे जात होता. मात्र वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रक थेट रस्त्याखाली जाऊन पलटला. अपघाताच्या वेळी ट्रकच्या केबिनमध्ये सहा मजूर झोपेत होते. झोपेतच झालेल्या या दुर्घटनेत संजय कनेरे, लीलाधर वालूलकर आणि अजित भलावी यांचा जागीच मृत्यू झाला. हे तिघेही मोवाड येथील रहिवासी होते. तर राजेंद्र राजगुरू, हेमराज कन्हेरे आणि सुभाष धुर्वे हे तीन मजूर गंभीर जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

## जळगावच्या तिन्ही धरणांचा पाणीसाठा थेट ४० टक्क्यांवर

### टंचाईमुळे जिल्ह्यात अखेर ११ टँकर सुरू

■ जळगाव

**जिल्ह्यातील** गिरणा, हतनूर आणि वाघुर या तिन्ही धरणांतील पाणीसाठा कडक उन्हाळा आणि वाढत्या बाष्पीभवनामुळे वेगाने कमी होऊन ४० टक्क्यांवर आला आहे. या संकटाच्या पार्श्वभूमीवर जलसंपदा विभागाने पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले आहे.

सध्या जळगाव जिल्ह्यातील सरासरी कमाल ४६ अंश तापमान नोंदवले गेले आहे. या वाढत्या तापमानाने सारेच होरपळले जात असून धरणातील पाण्याचे मोठ्या प्रमाणावर बाष्पीभवन होत आहे. यंदा पावसाळ्यात जिल्ह्यातील हतनूर, गिरणा व वाघूर हे तीनही प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरले होते. २३ एप्रिलला या तीनही प्रकल्पांचा साठा हा ५२ टक्के होता. मात्र आज हा साठा ४० टक्क्यांवर आला आहे. आतापर्यंत जिल्ह्यात यंदा एकही टँकर सुरू नव्हता.पण आता जिल्ह्यात सात गावांना अकरा टँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे. ४२ गावांत ४३ विहिरी या अधिग्रहीत करण्यात आलेल्या आहेत.

अमळनेर,जामनेर आणि भुसावळ तालुक्यात ही पाणीटंचाईची स्थिती उद्‌भवली आहे. पाणीसाठा वाढण्यासाठी धरणातील गाळ काढण्याचे सरकारने जाहीर केले. तरीही धरणातील गाळ कोण काढणार, कसा काढणार, कधी काढणार याबाबत कोणतेही मार्गदर्शन आलेले नसल्याने प्रशासनात संभ्रमाचे वातावरण आहे. यात हतनूर २९ टक्के, गिरणा ३१ टक्के तर वाघूर ६९ टक्के पाणीसाठा आहे.

## संभाजीनगर महापालिकेत उबाठाचे नगरसेवक बैलगाडीने दाखल

■ छत्रपती संभाजीनगर



**पेट्रोल,** डिझेल व सीएनजी दरवाढीच्या निषेधार्थ उबाठाच्या नगरसेवकांनी आज अनोखे आंदोलन करत बैलगाडीतून महानगरपालिकेच्या महासभेसाठी हजेरी लावली. यावेळी केंद्र तसेच राज्य सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. पोलिसांनी बैलगाडीला पालिका परिसरात प्रवेश देण्यास विरोध केला. यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

नगरसेवक म्हणाले की, सर्वसामान्य नागरिकांनी इंधन, खाद्यतेल यांचा वापर कमी करावा, असे आवाहन सरकार करते. मात्र निवडणुकांच्या काळात अशा सूचना का दिल्या जात नाहीत? सरकारचे धोरण सामान्य नागरिकांवर अन्यायकारक आहे. सरकारने अनावश्यक खर्च कमी करावा, नागरिकांना वेठीस धरू नये. पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करा, असे सांगितले जाते. पण त्याला पर्याय काय? त्यामुळेच आम्ही बैलगाडी आणि सायकलचा वापर करत आंदोलन करत आहोत.

## सिंधुदुर्गात बनणार आशियातील पहिले पाण्याखालील संग्रहालय

### निवृत्ती युद्धनौकेचे रुपांतर पर्यटन केंद्रात

■ सिंधुदुर्ग

**जिल्ह्यातील** वेंगुर्लेजवळील निवती रॉक्सजवळ भारताचे पहिले व आशिया खंडातील अद्वितीय ‘अंडरवॉटर म्युझियम’ म्हणजेच पाण्याखालील संग्रहालय व कृत्रिम प्रवाळ प्रकल्प साकारला जात आहे. या प्रकल्पांतर्गत भारतीय नौदलाची निवृत्त युद्धनौका‘आयएनएस गुलदार’ समुद्रतळाशी विसर्जित करण्यात आली आहे.

भारतीयनौदलाची अभिमानास्पद युद्धनौका ‘आयएनएस गुलदार’ ही अनेक दशकांपासून देशसेवेत कार्यरत होती. सेवामुक्त झाल्यानंतर आता या युद्धनौकेचे रुपांतर समुद्राखालील अद्वितीय पर्यटन केंद्रात करण्यात येत आहे. समुद्रतळाशी नियोजित पद्धतीने विसर्जित करण्यात येणारी ही युद्धनौका पर्यटकांसाठी आकर्षणाचे प्रमुख केंद्र ठरणार आहे. हे पायाखालील संग्रहालय आणि पाणबुडी पर्यटन प्रकल्पामुळे देश-विदेशातील पर्यटक मोठ्या प्रमाणावर आकर्षित होतील. स्थानिक युवकांना रोजगार, पर्यटन व्यवसायाला गती आणि जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला बळकटी मिळण्यास या प्रकल्पाचा मोठा हातभार लागणार असल्याचे जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी सांगितले. तारकर्ली-इसदा येथे आयोजित पत्रकार परिषदेत जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे बोलत होत्या. एमटीडीसीचे व्यवस्थापकीय संचालक नीलेश गटणे, नीपेंद्र नीरव, माझगाव शिपयार्ड, सुनील कोरटी,पाणबुडी तज्ज्ञ, संजय पाटील, अधीक्षक अभियंता, जितेंद्र सोनवणे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, क्षिप्रा बोरा, वरिष्ठ व्यवस्थापक जल पर्यटन एमटीडीसी, दीपक हरणे, व्यवस्थापक बांधकाम दीपक माने, प्रादेशिक अधिकारी एमटीडीसी उपस्थित होते.

## सातारा विभागातील एसटीचे तीन अधिकारी अखेर निलंबित

■ सातारा

**कर्तव्यात** कसूर केल्याचा ठपका ठेवत एसटी महामंडळाच्या सातारा विभागातील तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. विभागीय यंत्र अभियंता विकास माने, विभागीय सुरक्षा अधिकारी शेखर फरांदे आणि विभागीय भांडार अधिकारी सचिन गायकवाड अशी निलंबित केलेल्या अधिकाऱ्यांची नावे आहेत.

महामंडळाचे माहिती व तंत्रज्ञान महाव्यवस्थापक विरेंद्र कदम यांनी ८ आणि ९ मे रोजी शिरवळ तसेच पाटण आगारास भेट दिली होती. त्यावेळी त्यांनी तेथील परिस्थितीची माहिती घेतली असता त्यांना काही आक्षेपार्ह गोष्टी आढळून आल्या. यासंबंधित अहवाल त्यांनी कार्यकारी व्यवस्थापकांना पाठवला. त्यानुसार ही कारवाई करण्यात आली आहे. दोन्ही आगारातून अवैध प्रवासी वाहतूक सुरू असल्याचे कदम यांना आढळले होते. याप्रकरणी विभागीय सुरक्षा अधिकारी फरांदे यांना निलंबित केले.

## अदानी, अंबानी कोकणात अणुऊर्जा प्रकल्प उभारणार

■ मुंबई

**केंद्र** सरकारने अलीकडेच केलेल्या ‘शांती कायद्या’नुसार अदानी आणि रिलायन्स उद्योग समूह राज्यातील कोकणात अणुऊर्जा प्रकल्प उभारणार आहे.

काल मंगळवारी या प्रकल्पांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आले. राज्याची वीज निर्मितीची क्षमता वाढविण्यासाठी तसेच स्वच्छ ऊर्जा निर्मिती क्षेत्रात राज्यातील गुंतवणूक वाढविण्यासाठी राज्य सरकारने रिलायन्स, अदानी, बजाज आदी उद्योग समूहासोबत सुमारे २५ हजार ४०० मेगावॅट अणुऊर्जा निर्मितीसाठी सामंजस्य करार केले. अदानी कंपनी रत्नागिरी जिल्ह्यातील बारसू येथे तर रिलायन्स कंपनी पूर्णागड येथे तर




एनटीपीसी देवगड येथे अणुऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारणार आहे. या कंपन्या अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रात ६ लाख ५० हजार कोटींची गुंतवणूक करणार असून त्यातून जवळपास एक लाख २३ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये गुंतवणूक करण्यास इच्छुक असलेल्या कंपन्यांना सरकारच्या वतीने संपूर्ण सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली. राज्यात अणुऊर्जा निर्मिती प्रकल्पांना सर्वप्रकारचे साह्य करण्याच्या राज्य सरकारच्या भूमिकेनंतर अदानी पॉवर कंपनी, एनटीपीसीएल, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड, बजाज उद्योग समूहाची ललितपुर पॉवर जनरेशन कंपनी लिमिटेड या चार कंपन्यांनी राज्यात गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला असून राज्य सरकारने या कंपन्यांशी सामंजस्य करार केले.

## रत्नागिरीत हातात गावठी बॉम्बचा स्फोट! महिला गंभीर

**रत्नागिरी** - तालुक्यातील जांभारी फाटा परिसरात जंगलात सरपण गोळा करत असताना एका महिलेच्या हातात गावठी बॉम्बचा भीषण स्फोट झाला आहे.या दुर्घटनेत रेश्मा प्रमोद सुर्वे (४५) या महिला गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्या हाताची बोटे तुटली आहेत. त्यांना उपचारासाठी मुंबईला हलवले आहे. जयगड पोलिस स्टेशनच्या हद्दीत जांभारी फाटा येथे रेश्मा सुर्वे ही महिला नेहमीप्रमाणे लाकडे गोळा करण्यासाठी जंगलात गेली होती. तिथे तिला एक अनोळखी वस्तू दिसली,जी कुतूहलाने उचलण्याचा प्रयत्न केला असता तिच्या हातात स्फोट झाला.या अपघातात महिलेच्या डाव्या हाताची पाचही बोटे तुटली असून तिला गंभीर दुखापत झाली आहे.

## महाबळेश्वरच्या सौंदरी गावात वादळी पाऊस! घरांची पडझड

### आंब्यांच्या बागांचे मोठे नुकसान

■ महाबळेश्वर


**सातारा** जिल्ह्यातील महाबळेश्वर तालुक्यातील सौंदरी गावात झालेल्या मुसळधार वादळी पावसामुळे मोठे नुकसान झाले. जोरदार वाऱ्यासह झालेल्या पावसाने अनेक घरांची पडझड आणि घरांची छपरे उडाली. तर काही ठिकाणी भिंती कोसळल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

सौंदरी गावात वादळी पावसामुळे कलमी आंब्यांच्या बागांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक आंब्याची झाडे



मुळासकट उन्मळून पडली आहेत. तसेच भाजीपाला शेती पाण्याखाली गेल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अनेक मोठी झाडे उन्मळून वीजवाहिन्यांवर कोसळली. प्रशासनाने तातडीने पंचनामा करून नुकसानग्रस्तांना मदत द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. झाडे वीज वाहिन्यावर कोसळल्याने वीजपुरवठा खंडित झाला. त्यामुळे नागरिकांना अंधारात रात्र काढावी लागली. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी प्रशासनाकडे पंचनामे करून तातडीने मदतीची मागणी केली आहे.

# नवाकाळ शब्दकोडे–१६१२



**आडवे शब्द –**

१. वैरभाव, शत्रुत्व ५. आच्छादन, बुरखा ९. पापक्षालनासाठी फाल्गुनातील तिथी १३. अंमलबजावणी १४. कोडगा, मख्ख १५. साय १७. चोप १८. पक्का रस्ता २०. रूढी २२. श्वासोच्छ्वास २४. पराकाष्ठा २६. धनुष्य, स्त्रियांचे केशरचनेतील साधन २७. विजयी २८. करवत २९. उजेड ३०. वेगात ३२. बाद झालेला ३३. सारखेपणा ३४. वीज, लक्ष्मी ३६. कागदाची उभी घडी घालून पाडलेला भाग, वर्तमानपत्रातील स्तंभ ३७. वृक्ष, अरण्य, बाग ४२. उन्हाळ्यात फुलणारा तांबड्या फुलांचा देशी वृक्ष ४३. बहिणीचा मुलगा ४४. संतश्रेष्ठ ज्ञानदेव विरचित पसायदानातील शेवटचे चरण– 'तेथ म्हणे श्रीविश्वेशरावो, हा होईल दान पसावो, .......' ४५. पावनखिंडीच्या लढाईत धारातीर्थी पडलेले तानाजी मालुसरे यांची उपाधी ४७. बिकट प्रश्न ४९. मध्ये खंड न पडता ५०. वरचढ ५१. न बोलणे ५२. श्रीकृष्णासाठी पोहे घेऊन जाणारा बालमित्र ५४. पाण्यात बुडी मारणे ५५. घर ५६. कंड ५८. बगळा ६०. रुंद, स्थूल ६१. जमिनीखालचे पाणी, मूळचा झरा ६२. तळतळून उच्चारलेली वाणी ६३. कमतरता ६४. गर्दन, आदरभाव ६५. आक्षेप ६७. रक्तशोषक तरीही उपचारात उपयोगी कीटक ६८. राहणारा ७०. पाण्याचा पाट, आवाजांचा गोंधळ ७१. गढूळ, मिश्र ७२. अथवा ७३. कोना ७४. अचंबा, आश्चर्य ७५. केरळचे इतिहासप्रसिद्ध बंदर ७८. पुरे ८०. श्वसनासाठी आवश्यक असणारी ८२. सकल, सगळे ८३. दुबळा ८५. दक्षता ८७. पर्यावरणाला घातक असणाऱ्या गोष्टींना कायद्याने अटकाव ८८. मळवट ८९. मूर्ख, भोट

**उभे शब्द –**

१. 'देवाचिये द्वारी उभा क्षणभरी...' (संत तुकाराम) २. मुख्य ख्रिस्ती धर्मगुरू ३. छळ ४. पौर्णिमा ५. पक्षकार, कुळ ६. गुहा ७. असंमती ८. सुगंधी, छान वासाचे ९. हरणाचे पिल्लू १०. आकर्षक, लोभस ११. शांतता १२. समुद्रसपाटीवरचे हवामान १६. देव १७. विचार, हेतू १९. व्याघ्रगर्जना २१. दिवस २३. सर्व, सगळे २४. प्रवेश २५. शांत २८. पृथ्वीच्या कक्षेबाहेर प्रवास करणारे वाहन ३०. सभ्य, सज्जन ३१. शस्त्राची तीक्ष्णता, प्रवास ३२. दूर करणे, समाधान, निराकारण ३५. विदेश ३७. खोटा आरोप ३८. प्रचार करणारा, विचार पोचवणारा ३९. निकट, समीप ४०. हुकमाची तामिली ४१. नववधूचा सासरी छळ ४२. पळून जाणे ४३. आगामी, येऊ घातलेले ४६. मराठीत ब्लडप्रेशर ४८. छंद, गोडी ४९. जोडीदार ५०. प्रश्नोत्तरांची जुगलबंदी ५१. मजा, आनंद ५३. पैसेवाला, गडगंज ५४. ज्याला कोणी वैरी नाही असा ५५. स्वतःचे ५६. पणजोबांचे वडील ५७. खिन्न, तटस्थ ५९. दयाळू ६१. पिशाच्च ६३. औषध ६५. कमी वजनाचा ६६. डाग ६९. कोळशाच्या खाणीत सापडणारा मौल्यवान खडा ७०. वेळकाढूपणा ७६. लिहिलेले ७७. दुसऱ्यासाठी घेतलेला त्रास ७९. पौष्टिक, कसदार ८०अ. वचन (हिंदी) ८१. हातचलाखीचा खेळ ८४. ध्वनी ८५. पक्का, धूर्त ८६. पद्धत •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६११ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. ऋण ३. हसतमुख ७. कनात ९. वाचक ११. वारकरी १२. हलवाई १४. गोम १५. सिद्धटेक १६. दारा १७. दगदग १९. कुभांड २०. बस २३. पक्षी २४. चाकोरीबद्ध २७. बंगालचा उपसागर ३२. नारा ३३. जादू ३४. वसाहत ३८. लवकर ४०. प्रयत्न ४१. मशक ४२. कलीयुग ४३. समिधा ४५. तावदान ४७. जोम ४८. नमुनेदार ५०. खट्टू ५१. सरस ५२. लढा ५३. निब ५६. सहज ५७. खाई ५८. सायास ६०. आशादायक ६१. यजमान ६२. मैना ६३. माज ६४. सापळा ६६. नशीब ६७. वजन ७१. कावा ७२. भवताल ७३. कोळसा ७४. अंध ७५. कुचंबणा ७६. तापट ७८. जगरहाटी ८१. सीमित ८४. नृत्यांगना ८५. जबाबदारी ८८. सरकी ८९. सत्य ९०. संभावित ९१. किळस ९२. लुच्चा ९३. आबाळ ९४. नटराज

**उभे शब्द** : १. ऋद्धिसिद्धीचा नायक सुखदायक भक्तासी २. फरक ३. हरीदास ४. तह ५. मुलगा ६. खवा ८. नारद ९. वामकुक्षी १०. करंडक ११. वाटेकरी १३. ईद १८. गडप २०. बद्ध २१. लेंगा २२. वेचा २३. परवशता २५. कोरा २६. बडा २७. बंदूक २८. लग्न २९. उभय ३०. साडी ३१. मोह ३३. जावळ ३५. साकव ३६. तहान ३७. आयुध ३९. रसमलई ४०. प्रधान ४४. गोदाम ४५अ. दाणे ४६. गरज ४९. मुखिया ५१. सहनशीलता ५३. निशा ५४. बदाम ५५. पोकळ वासा ५६. समानता ५७. खानावळ ५८. साज ५९. ससा ६०. आळा ६३. मान ६५. पर्णकुटी ६८. जसा ६९. अधर ७०. दबदबा ७३. कोट ७४. अंगना ७७. पड ७८. जगदंबा ७९. हातभार ८०. मैदा ८२. मिसळ ८३. तरस ८४. नृत्य ८५. जतन ८६. बहिरा ८७. रीघ ८९. सच्चा

## देशातील १० राज्यांना उष्णतेच्या लाटेचा इशारा

पान १ वरून

देशाचा मोठा भाग भीषण उष्णतेने होरपळेल. या काळात ईशान्य आणि दक्षिण द्वीप्रकल्पातील काही भाग वगळता जवळपास अर्ध्या देशात उष्णतेची लाट राहील. सरासरी तापमान ४५ पर्यंत राहू शकते. ज्या हवामान प्रणालीमुळे यापूर्वी अनेक भागांमध्ये चांगला पाऊस पडत होता, त्या आता कमकुवत झाल्या आहेत. देशातील पंजाब, हरियाणा,चंदीगड, दिल्ली, राजस्थान, गुजरात, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र आणि तेलंगणामध्ये उष्णतेच्या लाटेचा इशारा जारी करण्यात आला आहे.

## देशव्यापी केमिस्ट बंद दुकानदारांचा पूर्ण प्रतिसाद

पान १ वरून

कोरोनाच्या काळात ऑनलाईन औषध विक्रीला परवानगी देणारा शासन आदेश निघाला. मात्र हा आदेश अजूनही लागू आहे. हा आदेश आता रद्द करावा. ऑनलाईन औषधविक्री करताना डॉक्टरचे प्रिस्क्रीप्शन नीट तपासले जात नाही हे धोकादायक आहे. शिवाय ऑनलाईन विक्रेते औषधांवर भरमसाठ डिस्काऊंट देतात हे रोखले पाहिजे. सरकारने आता आमच्या मागण्यांवर गंभीरपणे विचार करावा.

## अमेरिकन संसदेत इराणविरुद्धचे युद्ध थांबवण्याचा प्रस्ताव मंजूर

पान १ वरून

चर्चेदरम्यान त्यांनी सांगितले की सध्या युद्धविरामाबाबत चर्चा सुरू असताना ट्रम्प यांनी संसदेसमोर येऊन आपली रणनीती स्पष्ट करावी. युद्ध सुरू करण्याचा अधिकार फक्त राष्ट्राध्यक्षांकडे नसून संसदेकडे आहे.

तर व्हाईट हाऊसचे म्हणणे आहे की, ट्रम्प यांनी अमेरिकेच्या सुरक्षेसाठी आपल्या अधिकारांतर्गत कारवाई केली आहे. अमेरिकन कायद्यानुसार कोणताही राष्ट्राध्यक्ष संसदेमधून मंजुरी न घेता फक्त ६० दिवसांपर्यंत लष्करी कारवाई चालवू शकतो. त्यानंतर युद्ध थांबवावे लागते, काँग्रेसची परवानगी घ्यावी लागते किंवा सैन्याच्या सुरक्षित माघारीसाठी अतिरिक्त ३० दिवसांची मुदत मागावी लागते.

## मोदी-मेलोनी यांच्या 'मेलोडी' व्हिडिओमुळे पारलेचे शेअर वधारले

पान ८ वरून

खरेदी केली. गुंतवणुकदारांनी पारले प्रोडक्ट्स आणि पारले इंडस्ट्रीज या दोन नावात गफलत केली. प्रत्यक्षात 'मेलोडी' या टॉफीचे उत्पादन पारले प्रोडक्ट्स या सुप्रसिद्ध कंपनीद्वारे केले जाते. हीच कंपनी 'पारले जी', 'मोनॅको', 'क्रॅक जॅक', 'मँगो बाईट' आणि 'पॉपिन्स' यांसारख्या लोकप्रिय उत्पादनांची निर्मिती करते. पारले प्रोडक्ट्स ही एक खाजगी मालकीची कंपनी असून, ती शेअर बाजारात सूचिबद्ध नाही. तर दुसरीकडे, पारले इंडस्ट्रीज ही शेअर बाजारात वर सूचिबद्ध असलेली पूर्णपणे वेगळी कंपनी आहे आणि तिचा 'मेलेडी' या टॉफीशी कोणताही थेट व्यावसायिक संबंध नाही.

## वांद्र्यातील गरीबनगर झोपडपट्टीवर दुसऱ्या दिवशीही तोडक कारवाई

पान ८ वरून

तैनात होत्या. कारवाईदरम्यान परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. काही स्थानिकांनी प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करत, 'पर्यायी जागा द्या, मगच कारवाई करा' अशी मागणी केली. काही नागरिकांनी कारवाई रोखण्याचाही प्रयत्न केला. यावेळी पोलिसांनी सौम्य लाठीमार केला. त्यानंतर स्थानिकांनी दगडफेक केली.

याबाबत पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी विनीत अभिषेक म्हणाले की, २०१७ पूर्वीपासून सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करून ही मोहीम राबवली जात आहे. उच्च न्यायालयाने २९ एप्रिल २०२६ रोजी पश्चिम रेल्वेला अनुकूल असा निकाल दिला. त्यानुसार गरीबनगर परिसरातील सुमारे ५२०० चौरस मीटर क्षेत्र अतिक्रमणमुक्त करण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशानुसार ५०० अनधिकृत झोपड्या हटवण्यात येणार आहेत, तर ओळख पटलेल्या १०० झोपड्यांना वगळण्याचे निर्देश दिले आहेत. न्यायालयाच्या सूचनेनुसार निकालाच्या काही दिवसांनंतर ही मोहीम सुरू केली आहे. राज्य प्रशासन, महानगरपालिका आणि पोलिसांच्या समन्वयातून सविस्तर नियोजन केले आहे. गर्दीच्या भागात कारवाई करताना सुरक्षेची विशेष काळजी घेतली जात आहे. यासाठी नऊहून अधिक विशेष पथके तैनात करण्यात आली आहेत. गॅस सिलिंडर, ज्वलनशील वस्तू आणि वीजजोडणी यांची सुरक्षित हाताळणी करून कोणतीही दुर्घटना टाळण्यावर भर दिला जात आहे. आज सकाळी ८ वाजल्यापासून ही संयुक्त कारवाई पुन्हा सुरू झाली आहे. आतापर्यंत सुमारे २० टक्के काम पूर्ण झाले आहे. ही मोहीम पुढील काही दिवस सुरू राहणार आहे. या कारवाईमुळे रेल्वेच्या क्षमतेत वाढ होण्यास मदत होणार आहे. भविष्यात मुंबईतून आणखी ५० मेल-एक्स्प्रेस गाड्या चालवण्याचा रेल्वेचा मानस आहे. वांद्रे टर्मिनससह परिसराचा पुनर्विकास करून येथे एकात्मिक रेल्वे संकुल उभारण्याची योजना आखण्यात आली आहे. त्यामुळे प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा मिळणार आहेत. जोगेश्वरी टर्मिनल जवळपास तयार झाले आहे, तर वसई रोड टर्मिनलचे बांधकाम लवकरच सुरू होणार आहे. वांद्रे हे लोकल स्टेशन असून येथून उपनगरीय गाड्या धावतात. येत्या काही वर्षांत वांद्रे टर्मिनस स्टेशनचा संपूर्ण पुनर्विकास करण्यात येणार आहे. उन्नत रस्ते उभारले जातील, बहुमजली इमारती बांधल्या जातील आणि संपूर्ण परिसर एकात्मिक रेल्वे संकुल म्हणून विकसित केला जाईल. यामुळे भविष्यात अधिक मेल गाड्या चालवण्याची रेल्वेची क्षमता वाढणार आहे.

## शरद पवारांकडून पंतप्रधान मोदींची स्तुती

पान १ वरून – आज मुंबईत शरद पवार गटाची बैठक आयोजित केली होती. या बैठकीत रोहित पवार अनुपस्थित होते. त्यामुळे ते नाराज असल्याच्या चर्चेला बळ मिळाले. मात्र, रोहित पवार यांनी ही चर्चा फेटाळून लावत आपण पुण्यात शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी उपस्थित असल्याचे स्पष्ट केले. त्यांनी आज कुकडी आणि बारामती परिसरातील जनाई-शिरसाई पाणीप्रश्न सोडवण्यासाठी पुण्यातील सिंचन भवनात अधिकाऱ्यांशी चर्चा केली. यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरत जनाई-शिरसाई पाणीप्रश्नावर तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली. या बैठकीपूर्वी रोहित पवार म्हणाले की, जनाई-शिरसाई धरणातून अतिरिक्त पाणी सोडण्याचा निर्णय दोन दिवसांपूर्वीच होणे अपेक्षित होते, मात्र तो अद्याप न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढली आहे. फेब्रुवारीमध्ये कालवा फुटल्यामुळे आवर्तन मिळाले नाही आणि आता पुन्हा उशीर होत असल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत. बारामती हा सुनेत्रा पवार यांचा मतदारसंघ असताना तेथील शेतकऱ्यांचा प्रश्न सुटत नसेल, तर जबाबदारी कोणाची?

## मोटेगावकरांचे पुण्यातील 'नालंदा कॅम्पस' सील

पान ८ वरून – सीबीआयच्या तपासात समोर आले की, शिवराज मोटेगावकर यांनी त्याच्या साथीदारांना हाताशी धरुन अतिशय सुनियोजितपणे कट आखला. त्यासाठी मोटेगावकरने सर्वात आधी त्याच्या क्लासमध्ये काम करणारा पी.व्ही. कुलकर्णीची एनटीएच्या प्रश्नपत्रिका सेट करणाऱ्या पॅनलवर वर्णी लावून घेतली. सोबत मनीषा मांढरे हिचीदेखील एनटीएच्या पॅनलवर वर्णी लावण्यात आली. कुलकर्णी केमिस्ट्री आणि मांढरे बायोलॉजीच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्न पाठ करून ते मोटेगावकरपर्यंत पोहोच करणार, अशी सोय करण्यात आली. एनटीएमध्ये प्रश्नपत्रिका तयार करतानाच त्यांनी त्या प्रश्नपत्रिकांमधील प्रश्न तोंडपाठ केले. त्यानंतर ते हाताने लिहून काढून मोटेगावकरला पाठवले. मोटेगावकरने ते पीडीएफच्या स्वरुपात स्वतःच्या मोबाईलमध्ये सेव्ह करुन ठेवले आणि पुढे पैशांच्या बदल्यात त्यांची विक्री केली. ३ मे रोजी परीक्षा पार पडल्यावर मोटेगावकरने मोबाईलमधून ते डिलीट करुन पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. मात्र सीबीआयने मोबाईलमधील डेटा रिकव्हर केला आणि मोटेगावकरला अटक झाली. गेल्या वर्षी आरसीसी क्लासचे १९ विद्यार्थी नीट उत्तीर्ण झाले होते. त्यावेळी सुद्धा त्यांना पेपर उपलब्ध करून दिला होता का, याचीही तपास यंत्रणा चौकशी करत आहे.

## धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी बेस्टच्या दोन डेपोंची हस्तांतरण प्रक्रिया सुरू

पान ८ वरून

जातील. मात्र उर्वरित बस गाड्यांची व्यवस्था कुठे करायची हा पेच अद्याप कायम आहे. या डेपोंची ५.४१ एकर जमीन दोन्ही डेपो पर्यायी जागेत कायमस्वरुपी उभारल्यानंतर डीआरपीकडे हस्तांतरित करण्यात येणार आहे. नवे डेपो म्हणजे बहुमजली इमारती असणार आहेत. या इमारतींच्या तळमजल्यावर बस गाड्यांची व्यवस्था केली जाईल.तर वरच्या मजल्यांवर बेस्टची कार्यालये असणार आहेत. नव्या डेपोंच्या उभारणीचा कार्यादेश निघाल्यानंतर पाच ते सात वर्षांत बांधकाम पूर्ण होणे अपेक्षित आहे.जर हे काम वेळेत पूर्ण झाले नाही तर नवभारत कंपनीला दंड आकारण्याची तरतूद जून २०२४ मध्ये झालेल्या करारामध्ये आहे, असे सुत्रांनी सांगितले.

## विदर्भ होरपळला! पारा ४६ अंशपार नागपुरात उष्माघाताने ३ जणांचा मृत्यू

पान ८ वरून – उष्णतेमुळेच मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार अमरावती, अकोला आणि वर्धा जिल्ह्यांत तापमान ४६ अंशपार गेले. पुढील काही दिवस उष्णतेची लाट आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. नागपूरसह विदर्भासाठी 'हीट वेव्ह'चा इशारा देण्यात आला. दरम्यान, प्रखर उन्हाचा फटका शेतीलाही बसू लागला आहे. भंडारा जिल्ह्यात पपई आणि पेरूच्या बागांचे मोठे नुकसान होत असून उष्णतेमुळे फळगळ वाढली आहे. झाडांवरील फळे उन्हामुळे भाजली जात असून उत्पादनात घट होण्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. पाण्याच्या पातळीत घट होत असल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. नुकसानभरपाईची मागणीही करण्यात येत आहे. प्रशासनाने नागरिकांना दुपारी १२ ते ३ या वेळेत बाहेर पडणे टाळण्याचा सल्ला दिला आहे. भरपूर पाणी, ताक, लिंबूपाणी यांसारख्या द्रवपदार्थांचे सेवन करून शरीर हायड्रेट ठेवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## कृष्णा-गोदावरी गॅस प्रकरणात सुप्रीम कोर्टात

पान १ वरून

वतीने उपस्थित ॲटर्नी जनरल आर. वेंकटरमणी यांनी या मागणीला विरोध केला. त्यांनी न्यायालयाला सांगितले की सध्या सुनावणी सुरू ठेवावी आणि मध्यस्थीत काही प्रगती झाल्यास सरकार न्यायालयाला माहिती देईल. यावर सुप्रीम कोर्टाच्या खंडपीठाने सुनावणी स्थगित करण्यास नकार दिला. न्यायालयाने म्हटले की जर पक्षकार यशस्वी मध्यस्थीसह न्यायालयासमोर आले, तर प्रकरण निकाली काढता येईल. खंडपीठाने टिप्पणी केली की, जर मध्यस्थी यशस्वी झाली तर ते अत्यंत चांगले होईल, मग आम्ही प्रकरणाचा निकाल लावू. हा संपूर्ण वाद कृष्णा-गोदावरी बेसिनमधील गॅस स्थलांतराशी संबंधित आहे. केंद्र सरकारचा आरोप होता की रिलायन्स आणि तिच्या भागीदार कंपन्यांनी अशा गॅस साठ्यांमधून गॅस काढला ज्यावर त्यांना उत्खननाचा अधिकार नव्हता. सरकारने या कथित नुकसानीसाठी कंपन्यांकडून १.५५ अब्ज अमेरिकन डॉलरची मागणी केली होती. मात्र, जुलै २०१८ मध्ये आंतरराष्ट्रीय मध्यस्थी न्यायाधिकरणाने २-१ बहुमताने भारत सरकारचा दावा फेटाळून लावला होता. न्यायाधिकरणाने रिलायन्स आणि तिच्या भागीदार कंपन्यांच्या बाजूने निर्णय देत त्यांना ८.३ दशलक्ष अमेरिकन डॉलरची नुकसानभरपाई देण्याचाही आदेश दिला होता.

## मेटाची पुन्हा कामगार कपात सुरू पहाटे मेल! ८ हजार कर्मचारी काढले

पान १ वरून

टीममध्ये फेरनियुक्ती केली जाणार आहे. व्यवस्थापनातील पदांमध्ये कपात करून लहान टीमवर भर दिला जाणार असल्याचेही त्यांनी संकेत दिले. ही कपात विशेषतः इंजिनिअरिंग आणि प्रॉडक्ट टीमवर अधिक परिणाम करू शकते आणि वर्षाच्या पुढील काळात आणखी कर्मचारी कपात होण्याची शक्यता आहे.

संस्थात्मक पुनर्रचनेचा भाग म्हणून मेटाने सुमारे ६ हजार रिक्त पदेही बंद केली आहेत. जॅनेल गेल यांनी म्हटले आहे की, आता अनेक विभाग कमी स्तरावरील रचनेसह, लहान टीममध्ये अधिक वेगाने आणि अधिक जबाबदारीने काम करू शकतात. त्यामुळे उत्पादकता वाढेल आणि काम अधिक समाधानकारक होईल, असा आमचा विश्वास आहे. मेटाने गेल्या महिन्यात ८ हजार कर्मचाऱ्यांच्या कपातीची अधिकृत घोषणा केली होती. ही माहिती माध्यमांमध्ये पसरताच कर्मचाऱ्यांमध्ये असुरक्षितता आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते, अलीकडील आठवड्यांत, मेटाने एआय प्रशिक्षणासाठी कर्मचाऱ्यांच्या माऊस हालचाली आणि किबोर्डवरील टायपिंग ट्रॅक करणारे नवे सॉफ्टवेअर वापरण्यास सुरुवात केली आहे. या निर्णयाला कंपनीतून विरोध झाला असून १ हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांनी हे ट्रॅकिंग थांबवण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

दरम्यान, सिस्कोने गेल्या आठवड्यात ४ हजार पदे कमी करण्याची घोषणा केली होती, तर मायक्रोसॉफ्ट, ॲमेझॉन व इतर कंपन्यांनीही अलीकडे कर्मचारी कपात किंवा स्वेच्छानिवृत्ती योजना जाहीर केल्या आहेत.

## वाल्मीक कराडची प्रकृती खालावली

पान १ वरून

ठाण्यासह बर्दापूर, अंबाजोगाई शहर व केज पोलीस ठाण्यात एकूण १४ गुन्हे दाखल आहेत. एकट्या परळी शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध जमाव जमवणे, मारामारीचे ४, खुनाचा प्रयत्न, रस्त्यात अडवणूक ३, तर जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केल्याचे ३ असे १० गुन्हे दाखल आहेत. २०१९ मध्ये अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर पोलिसांत त्याच्याविरुद्ध फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल आहे. केज तालुक्यात अवादा एनर्जी या पवन ऊर्जा प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांना २ कोटींची खंडणी मागितल्याप्रकरणी कराडसह इतर तिघांवर गुन्हा दाखल झाला होता. सध्या तो मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात अटकेत आहे.


**न्यू जायफळवाडी एसआरए को-ऑप.हौ.सोसायटी लि**

(नोंद क्र.एमयूएम/एसआरए/एचएसजी/(टी.सी.)/११२४२/२००६ दिनांक २१/१२/२००६)
सी.एस.क्र.७२५ (भाग), पोलिस क्वार्टर्सच्या मागे, ताडदेव, मुंबई ४०० ०२६

**जाहिर सूचना**

न्यू जायफळवाडी एसआरए को-ऑप.हौ.सोसायटी लिमिटेड फॉरजेट हिल रोड, ताडदेव, मुंबई ४०००२६ च्या व्यवस्थापकीय समितीने सोसायटीच्या पात्र सभासदांच्या तसेच मयत सदस्यांच्या नावांची नोंदणी सुरू केली आहे.

नोंदणीची प्रक्रिया पार पाडताना, मयत सदस्यांच्या कोणत्याही सदस्याचा किंवा नामनिर्देशित व्यक्तीचा काही आक्षेप/दावा असल्यास, संबंधित सदस्यांनी त्यांचे आक्षेप/बदल, मूळ दस्तऐवज आणि वृत्तपत्रातील कात्रण याबाबतचे त्यांचे लेखी निवेदन ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत कार्यालयीन वेळेत (सायं.७.०० ते ८.३०) वर नमूद केलेल्या पत्त्यावर सादर करावे लागेल आणि तपशीलवार तक्रारी समितीसमोर विस्तारासह मांडावी लागेल.

निश्चित मुदतीनंतर कोणतीही हरकत/दावा प्राप्त झाल्यास, सोसायटी त्याचा विचार करणार नाही. अशा प्रकरणांमध्ये, भविष्यातही सोसायटी जबाबदार राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

| अ.क्र. | मूळ सदस्याचे नाव | नामनिर्देशित व्यक्तीचे नाव | फ्लॅट क्र. |
|---|---|---|---|
| १ | गणपत शिवराम लखन आणि प्रिताबाई गणपत लखन मयत | श्रीमती चंद्रकला चंद्रकांत लखन - सून | बी९-०९०८ |

न्यू जायफळवाडी एस.आर.ए. को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.करिता
दिनांक: २०.०५.२०२६ सही/-
ठिकाण: मुंबई अध्यक्ष / सचिव



**साई सेवा सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित)**

पत्ता : त्रिवेणी वाढ नं. ३, रुम नं. १, सर्वे नं. ३७, सी.टी.एस. नं. २७८ (पार्ट), सम्राट अशोक नगर, भाजी पाला वाडी, बोर्ला, गोवंडी, मुंबई ४०० ०८८.

**विशेष सर्वसाधारण सभा**

साई सेवा सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) सम्राट अशोक नगर, भाजीपाला वाडी, गोवंडी, मुंबई, संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा शनिवार, दिनांक ०६-०६-२०२६ रोजी सायंकाळी ठीक ६.०० वाजता, पत्ता- सवाई बॅनक्वेट ॲन्ड लॉन, वामन तुकाराम पाटील मार्ग, अमर सिनेमाच्या समोर, चेंबूर, मुंबई - ४०००७१. या ठिकाणी खालील विषयावर चर्चा करण्याकरिता आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेच्या वेळी उपस्थित रहावे हि नम्र विनंती.

**सभेचे विषय**

- नियोजित संस्थेसाठी नवीन विकासक व वास्तुविशारद नियुक्तीबाबत ठराव पारिजात करणे.
- साई सेवा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सर्व सभासदांना विनंती आहे कि सभेला येताना सर्व सभासदांनी सभेचे पत्रक व कागदपत्र घेऊन यावे.

सभेचे आयोजक (साई सेवा सहकारी गृहनिर्माण संस्था)
मुख्यप्रवर्तक : शोभा हनुमंत साबळे
मोबाईल नं. +९१ ७०२११६६८२२

नवा काळ
• पुणे | गुरुवार २१ मे, २०२६ • पान -८

# खा. हेमा मालिनींचा भाजपाचा झेंडा- सायरन वाजवत रिक्षातून प्रवास



**मथुरा-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पेट्रोल-डिझेल बचतीचे आवाहन केले आहे. त्याला प्रतिसाद देत खासदार हेमा मालिनी यांनी ई-रिक्षातून प्रवास केला. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या दिशा समितीच्या बैठकीसाठी जाताना त्यांनी या ई-ऑटोचा वापर केला. मात्र, या वाहनावर भाजपाचा झेंडा, आमदाराचे नाव असलेली प्लेट होती. शिवाय सायरन वाजवत त्यांनी हा प्रवास केला. ही रिक्षा स्थानिक भाजपा आमदार पूरन प्रकाश वापरत असल्याची माहिती आहे. या बैठकीनंतर हेमा मालिनी त्याच ई-ऑटोमधून रवाना झाल्या. यावेळी आमदार पूरन प्रकाश आणि राज्यसभा खासदार तेजवीर सिंह उपस्थित होते. हेमा मालिनी यांनी रिक्षातून वाजतगाजत प्रवास केल्याने त्यांचा हेतू प्रामाणिक होता का, असा प्रश्न विचारला जातो आहे.

# बारसू अदानीला, देवगडात एनटीपीसी पूर्णगडात रिलायन्स! कोकणावर सावट

■ मुंबई

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आज मंत्रालय, मुंबई येथे महाराष्ट्र शासन (ऊर्जा विभाग) आणि विविध कंपन्यांमध्ये अणुऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आले. या करारांतर्गत कोकणात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती प्रस्तावित आहे.



**राज्याच्या मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत कोकणातील महाकाय अणुऊर्जा प्रकल्पांसाठी लाखो कोटींचे सामंजस्य करार थाटामाटात पार पडले. यातून हजारो रोजगारांचे आणि गुंतवणुकीचे चित्र उभे केले जात असले तरी; बारसू, पूर्णगड आणि देवगडसारख्या अतिसंवेदनशील आणि निसर्गरम्य भागात उभारल्या जाणाऱ्या या प्रकल्पांमुळे कोकणचे निसर्गसौंदर्य, आंबा बागायती आणि मच्छिमारांच्या उपजीविकेवर मोठे संकट ओढवण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.**

रत्नागिरी जिल्ह्यातील बारसू येथे अदानी समूहाकडून तब्बल सहा हजार मेगावॅट क्षमतेचा अवाढव्य अणुऊर्जा प्रकल्प उभारला जाणार आहे. या प्रकल्पासाठी दीड लाख कोटी रुपयांची मोठी गुंतवणूक केली जाणार असल्याचे मुख्यमंत्र्यांकडून सांगितले जाते. परंतु, या प्रचंड मोठ्या प्रकल्पामुळे बारसू आणि त्याच्या सभोवतालच्या परिसरातील पारंपरिक शेती, जागतिक वारसा ठरू शकणारी अतिप्राचीन कातळशिल्पे आणि येथील स्थानिक परिसंस्थेला अत्यंत गंभीर धोका निर्माण होऊ शकतो, असा स्पष्ट इशारा पर्यावरणतज्ज्ञांनी दिला आहे. केवळ लाखो कोटींच्या गुंतवणुकीचे आकडे फेकून आणि रोजगाराचे गाजर दाखवून स्थानिक निसर्गाचा व साधनसंपत्तीचा बळी दिला जात असल्याची संतप्त भावना आता सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण होऊ लागली आहे.

**पूर्णगडच्या निळ्याशार समुद्रकिनाऱ्यावर रिलायन्सचे मोठे संकट**

रत्नागिरीतच पूर्णगडच्या नयनरम्य किनारपट्टीवर रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडतर्फे 'स्मॉल मॉड्युलर रिक्टर' तंत्रज्ञानावर आधारित अणुऊर्जा प्रकल्प उभारण्याचे नियोजित करण्यात आले आहे. या नव्या तंत्रज्ञानाच्या प्रकल्पाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होईल, असे आमिष सरकारकडून दाखवले जात आहे. मात्र, किनारपट्टीच्या अतिसंवेदनशील भागात होणाऱ्या या अणुभट्ट्यांच्या उभारणीमुळे येथील सागरी जीवसृष्टी आणि समुद्रकिनाऱ्यांचे नैसर्गिक सौंदर्य कायमचे नष्ट होण्याची दाट शक्यता आहे. या भागातील हजारो मच्छीमार कुटुंबांची उपजीविका केवळ समुद्रावर अवलंबून आहे. समुद्राच्या पाण्यावर आणि तापमानावर या प्रकल्पाचा थेट परिणाम होणार असल्याने स्थानिक मच्छिमारांच्या पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या पारंपरिक व्यवसायावर मोठी गदा येण्याची भीती व्यक्त होत आहे.



**देवगडच्या जागतिक कीर्तीच्या हापूस आंबा पिकाला एनटीपीसीचा थेट धक्का**

सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या अर्थकारणाचा कणा असलेल्या आणि अत्यंत निसर्गरम्य अशा देवगड भागात नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन म्हणजेच एनटीपीसीकडून आणखी एक मोठा अणुऊर्जा प्रकल्प उभारला जाणार आहे. देवगड हा संपूर्ण परिसर जागतिक स्तरावर केवळ हापूस आंब्यासाठीच नव्हे तर आपल्या स्वच्छ आणि सुंदर किनारपट्ट्यांसाठी तसेच पर्यटन क्षेत्रासाठी प्रसिद्ध आहे. अशा अत्यंत संवेदनशील आणि पूर्णपणे कृषिप्रधान असलेल्या पट्ट्यात एवढा मोठा विनाशकारी अणुऊर्जा प्रकल्प लादल्यास येथील संपूर्ण आंबा बागायती उद्‌ध्वस्त होण्याची शक्यता आहे. बागायतीसोबतच येथील वाढत्या पर्यटन व्यवसायावरही या प्रकल्पाचा अत्यंत प्रतिकूल परिणाम होईल, अशी धास्ती आता बागायतदार आणि पर्यटन व्यावसायिकांमधून वर्तवली जात आहे.

अदानी पॉवर लिमिटेड व त्यांची कोस्टल-महा टोमिक एनर्जी लिमिटेड यांच्या माध्यमातून रत्नागिरी जिल्ह्यातील बारसू येथे अणुऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी सामंजस्य करार झाला आहे. या प्रकल्पाची प्रस्तावित स्थापित क्षमता ६००० मेगावॅट असून १,५०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित आहे. यातून ४५०० प्रत्यक्ष तर ७५०० अप्रत्यक्ष असे एकूण १२,००० रोजगार निर्माण होतील.

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या वतीने रत्नागिरी जिल्ह्यातील पूर्णगड येथे भारत स्मॉल रिॲक्टर्स आणि स्मॉल मॉड्युलर रिॲक्टर अणुऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. या प्रकल्पाची प्रस्तावित स्थापित क्षमता २ बाय २२० मेगावॅट ते ६ बाय १२०० मेगावॅट असणार आहे. यासाठी ८००० ते २,००,००० कोटी रुपयांची प्रस्तावित गुंतवणूक असून, यातून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष मिळून तब्बल १,०३,००० रोजगार संधी निर्माण होणार आहेत.

नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड (NTPC) द्वारे सिंधुदुर्ग जिल्ह्यात देवगड येथे अणुऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. एकूण ६ युनिटद्वारे ४००० ते ७२०० मेगावॅट स्थापित क्षमता या प्रकल्पाची असेल. यात १,००,००० कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार असून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मिळून ५००० रोजगार संधी उपलब्ध होतील.

यावेळी मंत्री अतुल सावे, अदानी समूहाच्या न्यूक्लिअर एनर्जीचे बिझनेस हेड विवेक शर्मा, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या न्यूक्लिअर एनर्जी बिझनेसचे अध्यक्ष रंजय शरण, एनटीपीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्णदा प्रसाद सामल आणि शासनाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# मोदी-मेलोनी यांच्या 'मेलोडी' व्हिडिओमुळे पारलेचे शेअर वधारले! पण कंपनी वेगळीच

■ मुंबई



**भारताचे** पंतप्रधान नरेंद्र मोदी इटलीच्या दौऱ्यावर असताना त्यांनी इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांना 'मेलोडी' टॉफीचे पाकीट भेट दिले. ही लोकप्रिय भारतीय टॉफी पारले कंपनीची आहे. मोदी आणि मेलोनी यांचा 'मेलोडी' टॉफी देतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर मेलोडीचे उत्पादन करणारे म्हणून पारले इंडस्ट्रीजच्या शेअरच्या किमतीत वाढ झाली. मात्र, महत्त्वाची गोष्ट अशी की शेअर बाजारात सूचिबद्ध पारले इंडस्ट्रीज ही कंपनी प्रत्यक्षात 'मेलोडी' टॉफी बनवत नाही. तर ती कंपनी बांधकाम आणि पायाभूत सोयी उभारणारी कंपनी आहे.

पारले इंडस्ट्रीजचे शेअर दिवसभरात ५% ने वाढून ते ५.२५ रुपयांवर पोहोचले. किरकोळ गुंतवणुकदारांनी पारले नावाचा मेलोडी ट्रेंडशी संबंध जोडला आणि पारले इंडस्ट्रीज या सूचिबद्ध कंपनीच्या शेअरची जोरदार » पान ७ वर

# वनराज आंदेकरांच्या हत्येचा बदला मुख्य आरोपीच्या भावाची रस्त्यात हत्या

■ पुणे

**पुण्यात** पुन्हा एकदा टोळीयुद्धाने हिंसक वळण घेतले आहे. माजी नगरसेवक वनराज आंदेकर हत्या प्रकरणातील मुख्य आरोपीचा भाऊ अक्षय बापू म्हस्के उर्फ बाळा (२६) याची गोळ्या झाडून आणि कोयत्याने वार करून रस्त्यात निर्घृण हत्या करण्यात आली. ही धक्कादायक घटना बालाजी नगर परिसरात घडली आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

हल्लेखोरांनी बालाजी नगर येथे दबा धरून अक्षय म्हस्केवर जवळून गोळ्या झाडल्या. त्याला तीन गोळ्या लागल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर हल्लेखोरांनी त्याच्या चेहऱ्यावर आणि डोक्यावर धारदार कोयत्याने वार करत क्रूरतेची परिसीमा गाठली. अक्षय म्हस्केवर यापूर्वीही तीन वेळा जीवघेणे हल्ले झाले होते. मात्र, तो प्रत्येक वेळी बचावला होता. अखेर चौथ्या हल्ल्यात त्याची हत्या करण्यात आली. अक्षय हा वनराज आंदेकर खून प्रकरणातील मुख्य आरोपी आकाश म्हस्के याचा सख्खा भाऊ होता. वनराज आंदेकर यांच्या हत्येत आकाश म्हस्केची महत्त्वाची भूमिका असल्याचे तपासात उघड झाले होते. हत्येसाठी लागणारे पिस्तूल त्याने मध्य प्रदेशातून पुण्यात आणल्याची माहितीही उघड झाली होती. या कटामागे सोमनाथ उर्फ सोमा गायकवाड हा मुख्य सूत्रधार असल्याचेही निष्पन्न झाले आहे.

# धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी बेस्टच्या दोन डेपोंची हस्तांतरण प्रक्रिया सुरू

■ मुंबई

**अदानी** समूहाकडे असलेल्या धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी (डीआरपी) बेस्ट आपले दोन डेपो देणार आहे. धारावी आणि काळाकिल्ला हे दोन डेपो डीआरपीला देण्याबाबतची चर्चा दोन वर्षांपूर्वी सुरू झाली होती. त्या प्रक्रियेला आता वेग आला असून लवकरच त्यासंबंधीचा प्रस्ताव बेस्ट समितीसमोर मांडण्यात येणार आहे. या दोन डेपोंच्या बदल्यात बेस्टच्या २८८ बस गाड्यांसाठी तात्पुरती आणि कायमस्वरूपी पर्यायी जागेची व्यवस्था डीआरपी प्रकल्प उभारणारी नवभारत मेगा डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी करणार आहे, अशी माहिती बेस्टच्या सूत्रांनी दिली.



या दोन डेपोंचे एकत्रित क्षेत्रफळ सुमारे ११.५८ एकर एवढे आहे. हा भाग धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या कक्षेत येतो. नवभारत कंपनी सर्वप्रथम डेपोच्या जागेवर तात्पुरता डेपो उभारणार आहे. या डेपोमध्ये १४५ बसगाड्या सामावून घेतल्या » पान ७ वर

# फलटणच्या यशवंत बँकेचा परवाना आरबीआयकडून रद्द

■ मुंबई

## सर्व व्यवहार बंद करण्याचे निर्देश

**सातारा** जिल्ह्यातील कराडमध्ये बहुचर्चित असलेल्या यशवंत सहकारी बँकेचा परवाना रद्द करण्यात आला आहे. गैरव्यवहार प्रकरणामुळे या बँकेचे नाव समोर आले होते. त्यानंतर आता आरबीआयने परवाना रद्द करण्याची कारवाई केली आहे. फलटण इथल्या यशवंत सहकारी बँकेची आर्थिक स्थिती अत्यंत कमकुवत असल्याने आणि ती पुढे चालू ठेवणे शक्य नसल्याने परवाना रद्द करण्याचे पाऊल उचलण्यात आल्याचे आरबीआयने आपल्या कारवाईमध्ये स्पष्ट केले आहे. बँकेकडे पुरेसे भांडवल नाही आणि उत्पन्नाची पुरेशी संधी उपलब्ध नाही, बँकेच्या ठेवीदारांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत निकषांची देखील ही बँक पूर्तता करत नसल्याचे रिझर्व्ह बँकेच्या पाहणीत आढळून आले आहे. त्यामुळे यशवंत बँकेचे सर्व बँकिंग व्यवहार १९ मेपासून बंद करण्याचे निर्देश दिले आहेत. मागील वर्षभरापासून ही बँक रिझर्व्ह बँकेच्या निर्बंधाखाली असल्याने खात्यातून पैसे काढण्यावर कठोर बंधने होती. त्यानंतर आता परवानाच रद्द केला आहे.

# भोंदूबाबा अशोक खरातला सहा दिवसांची ईडी कोठडी

■ मुंबई

**भोंदू** अशोक खरातला आज पीएमएलए न्यायालयात हजर करण्यात आल्यानंतर न्यायालयाने त्याला ६ दिवसांची ईडी कोठडी सुनावली. मनी लॉन्ड्रिंग प्रकरणी ईडीने १० दिवसांच्या कोठडीची मागणी केली होती. मात्र दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने ६ दिवसांची कोठडी मंजूर केली.

सुनावणीदरम्यान ईडीने सांगितले की, खरातने समता नागरी क्रेडिट सोसायटीत अनेकांच्या नावाने तब्बल ६३ बोगस खाती उघडली होती. या सर्व खात्यांशी त्याचा मोबाईल नंबर जोडलेला होता आणि तोच लाभार्थी तसेच नॉमिनी होता. या खात्यांचा वापर पैशांचे लेअरिंग करण्यासाठी करण्यात आल्याचा आरोप आहे. या खात्यांमधून कोट्यवधी रुपयांची रोकड जमा आणि काढण्यात आली आहे. याशिवाय, खरातने ३४ बेनामी एफडी खाती उघडून त्यातूनही रोख व्यवहार केल्याचा आरोप आहे. २०१४ ते २०२४ या कालावधीत हा प्रकार सुरू होता. तसेच त्याच्या पत्नीच्या नावावरही मोठ्या प्रमाणात रक्कम व मालमत्ता जमा करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. या संपूर्ण व्यवहारामागील अंतिम लाभार्थी आणि इतर संबंधितांचा शोध घेण्यासाठी कोठडी आवश्यक आहे.

# विदर्भ होरपळला! पारा ४६ अंशपार नागपुरात उष्माघाताने ३ जणांचा मृत्यू

■ नागपूर

**संपूर्ण** विदर्भात सध्या उष्णतेची तीव्र लाट उसळली आहे. अनेक जिल्ह्यांत तापमानाने ४६ अंशांचा टप्पा ओलांडला आहे. नागपूरमध्येही गेल्या २४ तासांत तापमानात मोठी वाढ नोंदवली गेली. पारा ४५.५ अंश सेल्सिअसवर पोहोचला आहे. या प्रचंड उकाड्यामुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आणि आरोग्यावरही परिणाम जाणवू लागले. नागपूर शहरात गेल्या २४ तासांत तीन जणांचे मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे.



लकडगंज, गणेशपेठ आणि राणा प्रतापनगर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत हे मृतदेह बेवारस अवस्थेत सापडले. यामध्ये दोन पुरुष आणि एका महिलेचा समावेश आहे. पोलिसांनी तातडीने तिघांनाही शासकीय रुग्णालयात दाखल केले, मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. प्राथमिक माहितीनुसार, या तिघांचा मृत्यू उष्माघातामुळे झाला असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. अकोल्यातही असदगड किल्ल्याजवळ ५० वर्षीय व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. अंगावर कोणत्याही जखमा नसल्याने तीव्र » पान ७ वर

# मोटेगावकरांचे पुण्यातील 'नालंदा कॅम्पस' सील! लातूरमध्ये ८ भूखंडांची अवैध खरेदी

■ पुणे

**नीट परीक्षा** पेपरफुटी प्रकरणात मुख्य आरोपींपैकी एक असलेले शिवराज मोटेगावकरच्या आरसीसी क्लासच्या पुण्यातील डेक्कन भागातील शाखेवर पुणे महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी विभागाने आज बुलडोझर कारवाई केली. 'नालंदा कॅम्पस' म्हणून ओळखले जाणारे त्यांचे कार्यालयही पालिकेने सील केले आहे.

दरम्यान मोटेगावकरने लातूरमध्ये बेकायदेशीररित्या आठ भूखंड खरेदी केले असल्याची माहिती समोर आली आहे. शिवराज मोटेगावकरच्या आरसीसी क्लासच्या पुण्यातील डेक्कन भागातील शाखेवर पुणे महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी विभागाने बुलडोझर कारवाई केली आहे. क्लासचा भाग हा अतिक्रमण असल्याचा दावा पुणे महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी विभागाने करून ही कारवाई केली आहे. विना परवाना क्लास सुरू केला हे कारण देत पालिकेने क्लासला सील ठोकले.

मोटेगावकर यांच्या पत्नीला सीबीआयने चौकशीसाठी नोटीस बजावली असून त्यांचीही चौकशी होणार आहे. काल मोटेगावकर याच्या मुलाची सुमारे आठ तास चौकशी केली होती. » पान ७ वर

# वांद्र्यातील गरीबनगर झोपडपट्टीवर दुसऱ्या दिवशीही तोडक कारवाई



■ मुंबई

**वांद्रे** पूर्वेतील गरीबनगर भागात रेल्वे प्रशासनाकडून सुरू असलेली अनधिकृत झोपडपट्टी हटवण्याची कारवाई आज दुसऱ्या दिवशीही सुरूच राहिली. पुढील काही दिवस ही कारवाई सुरू राहील.

आज सकाळी ८ वाजल्यापासून मोठ्या पोलीस बंदोबस्तात ही मोहीम राबवण्यात आली. कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी रेल्वे सुरक्षा दल, स्थानिक पोलीस, महापालिका प्रशासन आणि रेल्वे अधिकारी यांच्या ९ तुकड्या » पान ७ वर

# कोकणच्या जागेवरून महायुतीत पेच तटकरे-गोगावले मुलांसाठी आग्रही

■ रायगड

**विधान** परिषदेच्या कोकण स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत उमेदवारीवरून शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये रस्सीखेच सुरू झाल्याने महायुतीत नवा पेच निर्माण झाला आहे. शिंदे गटाचे नेते मंत्री भरत गोगावले आपला पुत्र विकास गोगावले यांच्या उमेदवारीसाठी आग्रही आहेत. तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील तटकरे आपला मुलगा अनिकेत तटकरे याला उमेदवारी देण्याच्या प्रयत्नात आहेत.

रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या तिन्ही जिल्ह्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शिंदेंच्या शिवसेनेचे सर्वाधिक सदस्य असल्यामुळे कोकण मतदारसंघ आपल्या वाट्याला यावा, अशी शिंदे गटाची ठाम भूमिका आहे. या तर मागील निवडणुकीत येथून विजयी झालेले राष्ट्रवादीचे अनिकेत तटकरे याचे पुनर्वसन करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसही या जागेवर पुन्हा दावा करत आहे.

## हर घर नल, हर घर जल हे दिवास्वप्नच

सातपुड्याच्या दुर्गम भागात हर घर नल, हर घर जल हे दिवास्वप्नच आहे. २ ते ३ कि.मी. अंतरावर जाऊन पिण्यासाठी पाणी आणावे लागते. डोंगरदरीत पाण्यासाठी भटकंती करावी लागते, पाण्याचे ड्रम भरुन आणण्यासाठी गाढवांचा वापर केला जातो. गुरा-ढोरांसाठी पाण्याची वाणवा आहेच. एकूणच विश्वगुरु इंडियाला व आदिवासींच्या समस्यांशी काहीही देणे-घेणे नाही. कोणतेही पत्रकार व माध्यम प्रतिनिधी या भागात फिरकतही नाहीत. या भागात मोठ्या प्रमाणात मदतीची गरज आहे. सातपुड्यातल्या निसर्ग सौंदर्यासोबतच येथल्या समस्यांना जाणून घेण्यासाठी सातपुड्यात जरुर यावे, असे आवाहन संदीप देवरे यांनी केले आहे.

